म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ४०५



# श्रीगणेशपुराणसार.

गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए.,

एल् एल्. बी. यांनीं मूळ संस्कृतावरून काढलें.

---

आवृत्ति पहिली.

शके १८५१ सन १९२९

किंमत ४ आणे.

एक
सवड असेल



# श्रीगणेशपुराणसार.

गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए.,
एल् एल्. बी. यांनीं मूळ संस्कृतावरून काढलें.

आवृत्ति पहिली.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

शके १८५१ सन १९२९

किंमत ४ आणे.

एक ८.
सवड असेल

मुद्रकः-रघुनाथ रामचंद्र बखले, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स ऑफ इंडिया
सोसायटीज् होम, सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

लेखक व प्रकाशक—गणेश रामकृष्ण हवलदार,
बी. ए. एल् एल्. बी., आंग्रे यांची वाडी, गिरगांव-मुंबई.

अनुक्रम.............................. कि.
श्रीगजानन .......................... नों कि.

# प्रस्तावना.

हिंदु म्हटला म्हणजे, मग तो शिवाचा, विष्णूचा, रामाचा, कृष्णाचा अथवा विठ्ठलाचा भक्त असेना, तो आपल्या विशिष्ट दैवताचा अभिमान सोडून प्रत्येक मंगलकार्यारंभीं श्रीगणपतीचें पूजन अथवा स्मरण करतोच. हा अग्रपूजेचा मान फार मोठा आहे. धर्मराजाच्या घरीं राजसूययज्ञ झाला तेव्हां श्रीकृष्णाला हा मान मिळाला म्हणून त्याचा हेवा करणारा शिशुपाल प्राणांस मुकला. प्रत्येक हिंदु वर्षांतून एकदां म्हणजे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मृण्मय गणेशमूर्तीची घरीं स्थापना करून आनंदानें व मोठ्या भक्तीनें यथाविधि पूजा करतो. कित्येक तर कथा, कीर्तन, भजन, प्रवचन, व गायन करवून दहा दिवसांपर्यंत उत्सव चालू ठेवतात व ती मूर्ति पालखी, मेणा इ० " नृयानांत बसवून, छत्र चामर पताका घेऊन, दण्ड पट्टा खेळणाऱ्या बालकांस पुढें घालून मिरवणूक काढतात व तिचें महाजलाशयांत विसर्जन करतात. " *

अशा सर्व वर्णांच्या हिंदु स्त्री पुरुषांस पूज्य असलेल्या गणपतीचा महिमा गणेशपुराणांत गाइलेला असून गणपतीचें स्वरूप कसें आहे, तें कसें कळतें, त्याची उपासना कोणी केली, तो कोणाला प्रसन्न झाला, त्याचे अवतार किती झाले, त्याचें कार्य काय इ० सर्व गोष्टी विस्तृतपणें कथन केलेल्या आहेत. त्या जाणण्याची इच्छा असलेल्या श्रद्धाळु मराठी वाचकांकरतां हें सार अल्पमतीप्रमाणें काढून प्रस्तुत ग्रंथकर्ता प्रसिद्ध करीत आहे. ‡

---

* अपरस्मिन् दिने मूर्तिं नृयाने स्थापयेत् मुदा ॥ ३१ ॥
छत्रध्वजपताकाभिश्चामरैरुपशोभिताम् ।
किशोरैर्दण्डयुद्धेन युद्ध्यद्भिश्च पुरःसरम् ॥ ३२ ॥
महाजलाशयं गत्वा विसृज्य निनयेत् जले ( खण्ड १ अ. ५० )

‡ कै. भाऊशास्त्री लेले, मोदवृत्तकार व विष्णु वामनशास्त्री बापट यांनीं प्रत्येकीं एक असें खण्डशः प्रसिद्ध केलेलें या पुराणाचें समग्र भाषांतर फार रसाळ आहे तें सवड असेल त्यांनीं अवश्य वाचावें.

पुराणांचें मूळ कोठें आहे, पुराणांचे संपादक एक होते कीं अनेक होते, पुराणांचें संस्करण कसें होत गेलें, पुराणलेखकांचा धंदा कुलपरंपरागत होता किंवा कसा, पुराणांस वेदांचा आधार किति, त्यांची स्वतंत्र रचना किति, त्यांत इतिहासाचा भाग केवढा, कल्पनेचा केवढा, त्यांतील असंभाव्य गोष्टींचा उलगडा रूपकांनीं कसा होतो, नाना धर्मपंथांची उत्पत्ति, स्थिति व लय अथवा रूपान्तरें हीं क्रमशः कशीं होत गेलीं, पुराणांतील भूगोलविषयक माहितींत तथ्य किति आहे, कालगणनेचा प्रकार कसा आहे, देवदानवांच्या युद्धाचें स्वरूप काय आहे, एकाहून अधिक पुराणांत त्याच अर्थाच्या गोष्टी दिसून येतात, म्हणजे एकच व्यक्ति निरनिराळ्या वेषांत पुढें येते अथवा एकच वेषांत निरनिराळ्या व्यक्ती पुढें येतात असें भासतें त्यापासून काय अनुमान निश्चितपणें निघतें, आमच्या पौराणिक कल्पनांचा परदेशांत प्रसार किति झाला इ. सामान्य स्वरूपाचे अनेक प्रकारचे अनेक चर्चेचे विषय येथें घेतले नाहींत; कारण सर्व पुराणें, वेद, प्राचीन इतिहास, भूगोल, भूगर्भशास्त्र व ज्योतिःशास्त्र यांचा अभ्यास केल्याशिवाय मत देणें प्रशस्त नाहीं. शिवाय आधींच कांहीं पूर्वग्रह करून घेऊन त्या दृष्टीनें पुराण वाचणें इष्ट नाहीं. ह्या विषयांची चर्चा सर्व पुराणांच्या इतिहासांत येणें वाजवी आहे.

तूर्त या लघु ग्रन्थांत गणेशपुराणाचा कर्ता व काळ याविषयीं मोघम दोन शब्द प्रथम लिहून त्याचें सार देतांना आंतील तत्त्वज्ञान, कांहीं सामाजिक स्थिति दर्शविणाऱ्या गोष्टी व सुभाषित देऊन ग्रंथ पुरा केला आहे.

गणेशपुराण कर्त्याला वाचकाच्या हृदयांत ईश्वरभक्ति उत्पन्न करण्याची शैली चांगली साधली आहे; तत्त्वज्ञान सुलभ करून कथन करून सांगतां येतें; गोष्ट सांगण्याची कला साध्य आहे व कवि या दृष्टीनें त्याचें चातुर्य लहान सहान नाहीं याची कल्पना हा ग्रन्थ वाचून ध्यानांत येण्यासारखें आहे.

जर वाचकांनीं उत्तेजन दिलें तर याप्रमाणें सर्व पुराणांचें सार वेगवेगळें प्रसिद्ध करून शेवटीं सर्वांचा उपसंहार प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत ग्रंथकाराचा मनोरथ आहे. शेवटास नेणारा श्रीगणेश समर्थ आहे.

आंग्रे यांची वाडी,
गिरगांव–मुंबई.
तारीख २१ आगष्ट १९२९.

**गणेश रामकृष्ण हवलदार.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........................ दि
क्रमांक ........................

# श्रीगणेशपुराणसार.

## प्रकरण पहिलें.

### प्राथमिक निरूपण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स. क्र. ३५५
शाखा

**नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने ।**
**यस्यागस्त्यायते नाम विघ्नसागरशोषणे ॥ १ ॥**

( गणेशपुराण खण्ड १ अ. १ )

**अर्थः**—विघ्नरूपी सागराचें शोषण करण्याच्या कामीं ज्याचें नाम केवळ अगस्तिच आहे त्या ब्रह्मविद्या प्रदायक गणेशाला नमन करतों.

या पुराणांत दोन खण्ड असून एकंदर श्लोकसंख्या ११०७९ आहे. तीवरून पहातां विस्तारानें हें पुराण ब्राह्म व वामन इत्यादि कांहीं पुराणांची बरोबरी करतें.

परंतु हें उपपुराण असल्यामुळें पुराणाचीं सर्व लक्षणें यांत सांपडत नाहींत. पुराणांचीं लक्षणें देणारा देवी भागवतांत श्लोक आहे तो असा.

**सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणिच ।**
**वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ १४ ॥** ( स्कं. १ अ. १ )

**अर्थ**—पुराण म्हटलें म्हणजे त्याचीं लक्षणें पांच. १ सर्ग, २ प्रतिसर्ग, ३ वंश, ४ मन्वंतरें व ५ वंशानुचरित.

यांपैकीं पहिलीं दोन लक्षणें या पुराणांत आढळतात. अक्षर अशा ब्रह्मापासून गजाननाची उत्पत्ति अथवा परब्रह्माचेंच गजाननांत रूपांतर म्हणजे सर्ग, व गजाननापासून त्रिगुणात्मक प्रकृति व तिच्यापासून पंचभौतिक स्थावर जंगमात्मक सृष्टि मायेनें उत्पन्न करण्याकरतां व ती उत्पन्न केल्यावर तिचें रक्षण व लय करण्याकरतां, ब्रह्मा, विष्णु, महेश यांची उत्पत्ति म्हणजे प्रतिसर्ग.

या पुराणांत सोम व सूर्य यांच्या वंशांतील राजांची ऐतिहासिक वंशावळ जिला वंश म्हणतात तो नाहीं; त्याप्रमाणेंच मनूंची उत्पत्ति व आर्यांची कालगणना जिला मन्वंतरें म्हणतात तीं यांत नाहींत; मनुवंश नाहीं व त्यांतील पुरुषांचीं चरित्रें ज्यांस वंशानुचरित म्हणतात तीं नाहींत.

पुराणांचें साधारण लक्षण देणारा श्लोक पद्मपुराणांत आढळतो तो असाः—

**पुरां परंपरां वक्ति पुराणं तेन वै स्मृतम् ।**

याचा अर्थ असा आहे कीं पूर्वींची परंपरा काय आहे तें सांगणारें पुराण. हें लक्षण गणेश पुराणांत पूर्णपणें आहे. कारण या पुराणांत एका देवतेची (गणपतीची) उपासना परंपरेनें कशी चालू आहे तें दाखविलेलें आहे.

श्रीगणेशाचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. "गणानां त्वा गणपतिं हवामहे" हें ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळांतील तेवीसावें सूक्त प्रसिद्धच आहे.

चार प्रकारच्या विनायकांचा उल्लेख मानवगृह्यसूत्रांत आहे. तो असाः—

**अथातो विनायकान् व्याख्यास्यामः । शालकटंकटश्च**
**कूष्माण्डराजपुत्रश्चोस्मितश्च देवयजनश्चेति ।**

(पुरुष २ अध्याय १४ सूत्रें १–२)

शालकटंकट, कूष्माण्डराजपुत्र, उस्मित व देवयजन या विनायकांनीं झपाटलें असतां काय रूपें संभवतात तें पुढील ३ ते २१ सूत्रांत सांगितलें आहे.

**एतैरधिगतानामिमानिरूपाणि भवन्ति । लोष्ठं मृद्नाति । तृणानि छिनत्ति । अंगेपुलेखान् लिखति । अपः स्वप्ने पश्यति । मुण्डान् पश्यति । जटिलान् पश्यति । काषायवाससः पश्यति । उष्ट्रान् सूकरान् गर्दभान् दिवाकीर्त्यादीनन्यांश्च प्रयतान्पश्यति । स्वप्नान् पश्यति अंतरिक्षं क्रामति । अध्वानं व्रजन् मन्यते । पृष्ठतो मे कश्चिदनुव्रजाति । एतैः खलुविनायकैराविष्टाः राजपुत्रा लक्षणवन्तो राज्यं न लभन्ते । कन्याः पतिकामाः लक्षणवन्त्यो भर्तॄन् न लभन्ते......कृषिकराणां कृषिरल्पा भवति ।**

(अर्थ—यांनीं झपाटलेल्या पुरुषांत असे प्रकार आढळतात. तो मातीचीं ढिपळें फोडतो; गवत कापतो; अंगावर लेख लिहितो; त्याला स्वप्नांत पाणी दिसतें; मुंडन केलेले लोक दिसतात; जटिली दिसतात; काषाय वस्त्र परिधान केलेले दिसतात; उंटें,

डुकरें, गर्दभ, व हीन अनार्य लोक दिसतात; दुसरीं स्वप्नें पडतात; आकाशांत चालत आहें, मार्ग क्रमत आहें, पाठीमागून कोणी येत आहे असें त्याला वाटतें. या विनायकांनीं झपाटलेल्या राजपुत्रांस राज्याचा लाभ होत नाहीं. पतिप्राप्ति व्हावी अशी इच्छा करणाऱ्या कन्या या विनायकांनीं झपाटल्या म्हणजे त्यांस पतीची प्राप्ति होत नाहीं.

याज्ञवल्क्य म्हणतोः—

**विनायको विघ्नकर्मसिद्ध्यर्थं विनियोजितः ×× जपेत् स्वाहा ×× समन्वितान् । नामभिर्बलितंत्रैश्च नमस्कारसमन्वितैः ॥**

( अ. १ श्लोक २६७ )

**अर्थः**—विनायकाची योजना विघ्नसिद्ध्यर्थ केलेली आहे. ( अर्थात तो विघ्नकर्ता आहे तसा विघ्न हर्ताही आहे ) स्वाहाकारसहित नामोच्चार बलितंत्र व नमस्कारसहित जप करावा. हे गणपति विनायक एकस्वरूप आहेत. त्याप्रमाणें गणपतीची उपासना पहिल्या खण्डांत व विनायकाची लीला गणेशपुराणाच्या दुसऱ्या खण्डांत आली आहे.

या पुराणाच्या रचनेचा काल कोणता तें निश्चितपणें सांगतां येत नाहीं, कारण त्याच्या रचनेला आरंभ कधीं झाला व शेवट कधीं झाला तें दाखविणारी शक, वार व तिथि इ० कांहीं माहिती यांत नाहीं. तशी इतर पुराणांतही नाहीं. प्रत्येक पुराण व्यासानीं रचलें असा प्रत्येकांत उल्लेख दिसून येतो.

वेदाचे विभाग केल्यावर पांचवा वेद म्हणून मानलेल्या सर्वार्थपरिबृंहित अशा भारताची रचना व्यासांनीं केली; तथापि त्यांच्या आत्म्याला शान्ति प्राप्त झाली नाहीं. तो असंपन्न आहे असें त्यांस वाटूं लागलें. तेव्हां " वाखाणावें प्रेमें भगवद्यश मुनिवरा तुवां आतां " अशा नारदाच्या सुचनेवरून व्यासांनीं भागवत ग्रंथ लिहिला. ( भागवत स्कंध १ अ. ५ )

गणेश पुराण आणखी पुढें जाऊन म्हणतें " वेदांचे विभाग करून व्यासमुनि वेदांच्या अर्थाचें ज्ञान सिद्ध व्हावें म्हणून पुराणें रचण्यास जो आरंभ करतात तों त्यांच्या चित्तांत भ्रान्ति उत्पन्न होऊन त्यांस कोणताच विषय आठवेनासा झाला. याचें कारण काय असें त्यांनीं ब्रह्मदेवास विचारलें, तेव्हां ब्रह्मदेव म्हणाला " तूं सर्वज्ञतेच्या अभिमानानें कार्यारंभीं गणेशाचें पूजन अथवा स्मरण केलें नाहींस; म्हणून तुला भ्रान्ति उत्पन्न होऊन स्फूर्ति होत नाहीं. " ब्रह्मदेवानें मग त्यांस गणेशाचा मंत्र सांगितला व त्याचें अनुष्ठान करावयास सांगितलें. गणेशाचें अनुष्ठान करीन असें सांगून मला

गणेशाचा महिमा वर्णन करून सांगा अशी व्यासांनीं ब्रह्मदेवास विनंति केली. तीवरून ब्रह्मदेवानें हें पुराण त्यांस सांगितलें. नंतर यथोक्त अनुष्ठान करून व्यासांनीं वरप्राप्ति करून घेतली आणि हें पुराण ब्रह्मदेवाच्या मुखानें जसें ऐकिलें तसें वैशंपायनांस सांगितलें. तेव्हांपासून तें भूलोकीं प्रसिद्ध झालें. यानंतर व्यासांनीं अठरापुराणें व तितकींच उपपुराणें रचलीं. ( खण्ड १ अ. ९ व ११. खण्ड २ अ. १५०. )

या म्हणण्यांत थोडा औचित्याचा भंग दिसून येतो. जशीं मुख्य नगराच्या आधीं उपनगराची रचना संभवत नाहीं तशी मुख्य भागवतादि पुराणांच्या आधीं उपपुराणाची रचना संभवत नाहीं. या म्हणण्याला कांहीं अंतर्गत पुरावा आहे.

या पुराणांत खण्ड २ अ. १४९ येथें स्कंदपुराण व लिंगपुराण यांचा उल्लेख आहे; म्हणून हें पुराण या दोन्हीं पुराणांच्या नंतर रचलेलें आहे. अठरा पुराणांचा—ज्यांत स्कंद व लिंग येतात त्यांचा-उल्लेख महाभारताच्या अठराव्या पर्वांत आहे. शिवाय खण्ड २ अ. १५५ येथें हरिवंशाचा उल्लेख आहे. हरिवंशाचा समावेश महाभारतांत होतो. म्हणजे हें पुराण महाभारताच्याही नंतर झालें असलें पाहिजे. कितिनंतर तें पाहूं.

मि. मॅक्डोनेल यांच्या मतें महाभारताचा काल खि. पू. ३०० वर्षांहून अलिकडे आणतां येत नाहीं. ( पहा मि. मॅक्डोनेलकृत हिंदी सारस्वताचा इतिहास. ) रा. व. चिंतामणराव वैद्यांच्या मतें हाच काल शक्य दिसतो. ( पहा त्यांची महाभारतावरील टीका. )

रहस्यकारांच्या मतें महाभारताचा काल खि. पू. पांचशें वर्षांचा ठरतो. ( पहा गीतारहस्य, महाभारताचा काल ) म्हणून गणेशपुराण खि. पू. ५००–३०० वर्षांच्या नंतर लिहिलें गेलें असावें.

हिंदी लोकांस राशींचें ज्ञान प्रथम झालें तें ग्रीकांपासून झालें असें कित्येकांचें मत आहे; कारण मेष वृषभादि हिंदीलोकांनीं राशींनां दिलेलीं नांवें ग्रीकांनीं राशींना दिलेल्या नांवांचीं भाषांतरें आहेत. एवढेंच नाहीं तर कित्येक वेळां ग्रीक ज्योतिःशास्त्रांतील शब्दांचीं भाषांतरें करीत न बसतां ते शब्द जसेच्यातसेच हिंदी लोकांनीं आपल्या ज्योतिःशास्त्रांत घेतले आहेत. उदाहरणार्थ होराशास्त्र या शब्दांतील होरा हा शब्द लॅटिन आहे. रोमक सिद्धान्त यांतील रोमक हा शब्द रोमन या शब्दाचा अपभ्रंश आहे. असा शब्दविनिमय होण्याचा मुख्य काल म्हणजे शिकंदर बादशहाच्या

हिंदुस्थानावरील स्वारीचा म्हणजे खि. पूर्वी ३२७ वर्षांचा होय † गणेश पुराणांत दोन तीन ठिकाणीं राशींचा उल्लेख आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीस सोमवारीं स्वाती नक्षत्रावर सिंह लग्नीं पांच शुभ ग्रहांचा योग आला असतां* पार्वतीच्या पोटीं गणेश जन्मास आला. प्रथम खण्डांत शेचाळिसाव्या अध्यायांत गणपतिसहस्रनाम आहे. त्यांत गणपतीला काल व त्याच्या विभागाचीं नांवें देतांना त्याला तूं लग्न आहेस, तूं होरा आहेस इ० म्हटलें आहे. × यावरून पहातां गणेशपुराण खि. पूर्वी ३०० वर्षांच्या नंतर झालें असावें.

अध्यात्मज्ञान, कर्म व भक्ति यांची सांगड लावणारें व अनासक्त राहून उत्साहपूर्वक सतत कर्म करीत रहावें असें प्रतिपादन करणारें कृष्णार्जुनसंवादरूपी एक प्रकरण महाभारतांत आहे. त्याला भगवद्गीता असें म्हणतात. तिचा विषय तत्त्वज्ञानासारखा गहन असून सौंदर्यांत तिची सर पावणारा जगाच्या सारस्वतांत एकादा दुसरा ग्रंथ मिळेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. अशा सारखें प्रकरण, गीता या नांवाचें तरी, आंत असल्याशिवाय कोणतेंही पुराण संपूर्ण असणें शक्य नाहीं असा अभिप्राय पडून तशीं प्रकरणें अनेक पुराण कर्त्यांनीं त्या त्या पुराणांत प्रविष्ट करून ठेवलीं आहेत. परंतु भगवद् गीतेंतील अस्सल तेजापुढें हीं प्रकरणें फिक्कीं पडतात, भगवद्गीतेच्या केवळ नकला वाटतात, भगवद् गीतेचीं अनुकरणें दिसतात. यावरून भवगद् गीता सर्वत्र लोकमान्य झाल्यावर या प्रकरणांची रचना झाली असावी हें उघड आहे.

गणेश पुराणांत गणेशगीता म्हणून एक प्रकरण आहे तें थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बहुतेकांशीं भगवद्गीतेचा दुसऱ्या शब्दांत दिलेला सारांश आहे. एवढ्यावरून भगवद्गीता लिहिल्यावर गणेशपुराण लिहिलें गेलें असलें पाहिजे. न्या. काशीनाथपंत तेलंग आपल्या गीतेच्या इंग्रजी भाषांतराच्या प्रस्तावनेंत ह्मणतात:–"भगवद्गीतेचा काल खि. पू. दोन किंवा तीन शतकांहून उशीरां धरतां येत नाहीं. अगोदर किति धरावा हें मात्र निश्चित सांगतां येत नाहीं." तेव्हां या पुराणाचा काल ख्रिस्तापूर्वी दोनतीन

---

† रा. ब. चिंतामणराव वैद्य यांच्या मतें हिंदी लोकांस राशींचें ज्ञान ग्रीकांपासूनच झालें पण तें खि. पूर्वी २०० वर्षांच्या सुमारास झालें. ( पहा त्यांचें रामायणाचें कोडें )

* भाद्रशुक्लचतुर्थ्यां तु शशिवारेच वायुभे ।
सिंहलग्ने पंचशुभग्रहयुतेऽभवत् सुतः ॥ १४ ॥ ( खं. २ अ. ८२ )

× लग्नं होरा कालचक्रं मेरुः सप्तर्षयो ध्रुवः । २७

शतकांच्या सुमारास पडूं शकतो. कालनिर्णायक असा आणखी एक पुरावा या पुराणांत आढळतो. क्रीडाखण्डांत सत्तेचाळीसाव्या अध्यायांत पुढील गोष्ट आली आहे.

इक्ष्वाकुवंशांतील दिवोदासाच्या राज्यांत पापाची उत्पत्ति करण्याकरतां बौद्धरूपी विष्णु आला व आपल्या मायेनें सर्व जनांस मोहित करता झाला. तो ह्मणाला, " अरे ! परमात्मा हृदयांमध्यें स्थित असतांना पार्थिव मूर्तींची अर्चा कां करतां ? हे जन मूढ झाले आहेत ! जीवंत वृक्षांचा छेद करतात व पशूंची हिंसा करतात ! आपलें वित्त दुसऱ्यास देतात तें कां ? देह नष्ट झाला ह्मणजे पंच स्थूल भूतें पंच सूक्ष्म भूतांत लय पावतात. ह्मणून आपणच घृतयुक्त पक्वान्नें खावीं व या देहरूपी आत्म्याची नानाभोगांनीं पूजा करावी. "

यांत मूर्तिपूजा व पशुहिंसा यांचा विरोध करणाऱ्या बुद्धाच्या मतांत चार्वाकाच्या मतांचें मिश्रण केलें आहे व त्याच्या विषयीं लोकांचीं मनें आणखी दूषित करण्याकरतां त्याच्या आधींच गढूळ केलेल्या मतांत आणखी कालवा कालव केली आहे ती अशीः—" जो आपल्या देहांत व जो आपल्या पतीच्या देहांत असतो तोच दुसऱ्याच्या देहांत असतो. देहभिन्नत्वानें आत्मा भिन्न होत नाहीं." या विशेष मतांचा स्त्रियांवर परिणाम झाला. ब्राह्मणांचा अग्निहोत्राच्या ठिकाणीं आदर नाहींसा झाला. देव व ब्राह्मण यांचें पूजन व यज्ञीय पशूंचें छेदन या विषयीं लोक संशययुक्त झाले व स्वतांच श्राद्धें वगैरेचा भोग भोगूं लागले. धर्माचा लोप होऊन राजधानींत पाप उत्पन्न झालें. या कामीं बुद्धाला त्याच्या कमला नामक स्त्रीचा उपयोग झाला असें म्हटलें आहे. कमला हें नांव ज्या अर्थीं बुद्धाला विष्णूचा अवतार मानला आहे त्या अर्थीं विष्णूप्रमाणें त्याची स्त्री कमला असावी हें उचितच आहे. या गोष्टींत प्रथम बुद्धाला विष्णूचा अवतार म्हटलें आहे. तें काम बुद्धाच्या निर्वाणानंतर म्हणजे खिस्तापूर्वी ४७७ व्या वर्षानंतर बौद्ध पंडितांनीं केलें. त्याला कारण बुद्धधर्माचा उत्तरोत्तर उत्कर्षच होऊं लागला. त्याच्या ऐश्वर्याच्या परमावधीचा काल चंद्रगुप्ताचा नातू जो अशोक त्यानें बुद्धधर्माला राजाश्रय दिला तेव्हां झाला व तेव्हांच बुद्धाचें विष्णुरूप पुराणांतरीं मान्य झालें म्हणजे बुद्धाला विष्णूचाच अवतार लोक मानूं लागले. परंतु आणखी बऱ्याच वर्षांनीं म्हणजे शकें ८००–८२० च्या सुमारास श्रीशंकराचार्यांचा अवतार होऊन यादेशांतून बौद्धधर्माचें समूळ उच्छेदन झालें. त्या काळानंतर वरील दिवोदासाच्या कथेंत दिल्याप्रमाणें बुद्धाची चार्वाकाशीं जोडी लावून

त्याची उघड निंदा सुरू झाली. यावरून पाहतां गणेश पुराण हें इसवी सनाच्या नवव्या शतकानंतर रचिलें गेलें—निदान हल्लींच्या स्वरूपाचें तरी—असा म्हणतां येईल. कारण पुराणांतून कांहीं मजकूर मागून मागून प्रविष्ट झाला आहे. असा सर्वत्र समज आहे.

त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं सर्व उपपुराणांचा जन्मकाल इसवीसनाच्या ११०० ते १४०० शतकापर्यंत आणून टेविला आहे. ( पहा काळेकृत पुराणनिरीक्षण प्रकरण दुसरें. )

याशिवाय या पुराणांत एकादा दुसरा मजकूर प्राचीन गोष्टीच्या संशोधनार्थ उपयोगी पडेल असा आढळतो. उदाहरणार्थ. देवान्तक व विनायक यांचें युद्ध चालू असतां दैत्य पुष्कळ मरत; परंतु त्यांस शुक्राचार्य संजीवनी विद्येच्या जोरावर जीवन्त करी हें पहातांच देवपक्षांतील एका कृत्येनें शुक्राचार्यांला वर्वर देशांत नेऊन सोडून दिलें. तेव्हांपासून त्यास वर्वरदेशीय म्हणूं लागले. ( पहा खं. २ अ. ६४ ) युद्धाला निघण्यापूर्वी अघोर मंत्राचा जप करून अग्नींत देवान्तकानें पुत्राच्या मस्तकाची आहुति दिली. ( पहा खं २ अ, ६६ ) परंतु या सारभूत संक्षिप्त स्वरूपाच्या ग्रंथांत असल्या विषयांची नुसत्या निर्देशापलीकडे चर्चा करणें शक्य नाहीं.

---

# प्रकरण दुसरें.

## श्रीगणेशपुराणसार

**अधर्मोपचयो धर्माऽपचयो हि यदा भवेत् ।**
**साधून्संरक्षितुं दुष्टांस्ताडितुं संभवाम्यहम् ॥ १० ॥**
**उच्छिद्याधर्मनिचयं धर्म संस्थापयामिच ।** ( खं. २ अ. १४० )

( **अर्थः**—जेव्हां अधर्माची वृद्धि व धर्माचा क्षय होतो तेव्हां साधूंचें संरक्षण करण्याकरतां व दुर्जनांचें शासन करण्याकरतां मी अवतार घेत असतों. अधर्म संचयाचा उच्छेद करून धर्माची स्थापना करतों. )

शौनकांच्या द्वादश वार्षिक सत्रांत ऋषी निमग्न असतां विश्रान्तीच्या वेळीं त्यांना शुकांनीं प्रथम अठरा पुराणें सांगितलीं व नंतर त्यांच्या विनंतीवरून अठरा उपपुराणें

गणेशाचा महिमा आधीं वर्णन करून सांगितली त्यांत गणेशपुराण पहिलें होतें. वक्त्यांच्या व श्रोत्यांच्या मोठेपणामुळें जेवढें महत्व मुख्य पुराणांस आहे तेवढेंच या उपपुराणास यागोष्टीमुळें येतें.

याची परंपरा अशी आहे कीं हें पुराण पहिल्याप्रथम ब्रह्मदेवानें व्यासमुनींस सांगितलें. व्यासांनीं भृगूस सांगितलें.

कर्मविपाकानें कुष्ठग्रस्त सोमकान्त राजा भृगूच्या आश्रमीं प्राप्त झाला. त्याला उपाय म्हणून हें पुराण श्रवण कर असें मुनि म्हणाला, श्रवण करीन असा संकल्प राजानें केला तोंच तो व्याधि मुक्त झाला. असें तें पुण्यकारक पुराण काय आहे तें मला कृपाकरून सांगा असें राजा मुनीस म्हणाला. मुनींनें पुराण सांगण्यास आरंभ केला. तेव्हां प्रथम त्यानें व्यासमुनींची गोष्ट सांगितली.

वेदांचे विभाग करून पुराणांचे विभाग करण्यास व्यासांनीं आरंभ केला खरा पण विद्येच्या मदानें युक्त होऊन आरंभीं गणेशाची त्यांनीं स्तुति केली नाहीं म्हणून विघ्नांनीं पराभूत होऊन त्यांस कोणताच विषय आठवत नाहींसा झाला. याचें कारण काय हें जाऊन ब्रह्मदेवास विचारल्यावरून ब्रह्मदेव म्हणाला: " आधीं गणपति स्मरण केलें नाहींस पण आतां त्या परमानंद ब्रह्मस्वरूप विघ्नहर्त्यास शरण जा. मी मंत्र देतों त्याचा जप करून गणपतीला प्रसन्न करून घे व माझ्या हृदयांत स्थिर रहा असा वर माग " (ख. १ अ. १० ) त्याप्रमाणें पुढें वनांत जाऊन व्यासांनीं जप व तप केल्यानंतर त्यांस गजानन प्रसन्न झाला व अठरा पुराणें व तितकींच उपपुराणें करण्याचें सामर्थ्य त्यानें व्यासांस दिलें ( ख. २ अ.१५० ).

परंतु व्यासांनीं आधीं ब्रह्मदेवास विनंति केली " गणपतीचें रूप कसें आहे, तें कळतें कसें, तो कोणाला प्रसन्न झाला, त्याचे अवतार किती झाले व त्याचें कार्य काय हें सर्व विस्तारें करून हे करुणानिधे ! मला सांग. "

त्यावरून क्रमाक्रमानें वरील प्रश्नांचें उत्तर द्यावयास म्हणजे प्रत्यक्ष गणेशपुराणास ब्रह्मदेवानें आरंभ केला. तो असा—पूर्वीं प्रलय झाला असतां गजानन अणूहून अणुरूप धरून होता, तमोवृत असा बहुकाल लोटल्यावर नादब्रह्म उत्पन्न होऊन तेंच गजानन बनलें व त्यापासून सत्व, रज, तम हे गुण उत्पन्न झाले. त्या गुणांपासून मी ( ब्रह्मदेव ) विष्णु, व महेश उत्पन्न झालों. पण आम्हांस गजाननाचें—आमच्या जनकाचें—दर्शन व्हावयास पाहिजे होतें. तें सर्वत्र फिरून होईना म्हणून आम्हीं जपपरायण अनेक वर्षें

राहिलों. तेव्हां आमची करुणा येऊन गणपतीनें आम्हांस दर्शन दिलें व तिघांस सृष्टि, स्थिति व लय अशीं क्रमानें तीन कार्यें नेमून देऊन तीं करावयास सांगितलीं. सृष्टि कशी करावी या विषयीं मला शंका उत्पन्न झाली; म्हणून गजाननानें आपल्या पोटांतील अनेक ब्रह्मांडें औदुंबराच्या वृक्षावर जशीं फळें अथवा त्या फळांत जशीं मशकें तशीं दाखविलीं व त्यांतील एक फोडून आंत सर्व चराचर सृष्टि दाखविली. मी काय आतां सृष्टि तेव्हांच करीन असा मला गर्व झाला; पण साकार विघ्नांनीं माझी पाठ पुरवली. मी गजाननाची प्रार्थना करतां " तप कर " अशी आकाशवाणी झाली. जलमय भूवर तप कसें करूं असें म्हणतां वट पहा असें म्हणाली. त्याचें चिंतन करीत असतां मी स्वप्नांत वटवृक्षाच्या पानावर गजाननाची बालमूर्ति पाहिली. तिनें पुढें येऊन एकाक्षरी मंत्राचा जप करावयास सांगितला. तो केल्यावर गणपतीनें दर्शन देऊन सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य मला दिलें व पूर्वीं प्रमाणें मी सृष्टि उत्पन्न केली.

गजाननाचें स्वरूप वर्णन करून तें जपतप मंत्रादिकांनीं कळून येतें व गणपति विघ्नांचें निवारण करतो असा स्वानुभव सांगून मंत्राचें सामर्थ्य दाखविण्याकरतां ब्रह्म-देवानें मधुकैटभांची गोष्ट सांगितली.

## मधुकैटभांची गोष्ट.

ब्रह्मदेव म्हणाला, " विष्णु योगनिद्रागत असतां त्याच्या श्रोत्रापासून मधु व कैटभ हे दैत्य उत्पन्न झाले. या त्रैलोक्याला त्रस्त करणाऱ्यांचें मरण विष्णूच्या हातून होतें. परंतु शंकराच्या सांगण्यावरून त्यानें जेव्हां गणेशाच्या मंत्राचा जप विष्णूनें केला तेव्हांच त्याला युद्धांत यश आलें.

नंतर गजानन कोणाकोणाला प्रसन्न झाला या प्रश्नाचें उत्तर देतांना ब्रह्मदेवानें भीमराजाची गोष्ट सांगितली.

## भीमराजाची गोष्ट.

विदर्भ देशांत कौडिन्यपुरांत भीम नांवाचा राजा होता. त्याची चारुहासिनी नांवाची पतिव्रता स्त्री होती. ती वंध्या होती. अपुत्राला गति नाहीं; म्हणून मंत्रिजनांच्या स्वाधीन राज्य करून भीम पत्नीसह वनांत गेला. तेथें विश्वामित्राचें दर्शन झालें. ऋषीनें दक्षाच्या मंदिरांत अनुष्ठान करावयास सांगितलें. तें करतांच राजाला पुत्र झाला. तोच पुढें रुक्मांगद म्हणून प्रसिद्ध झाला. दक्ष कोण हें कळण्याकरितां ऋषीनें राजाचें पूर्ववृत्त सांगितलें.

## दक्षाची गोष्ट.

भीमाचा सातवा पुरुष नांवानें भीमच होता. त्याला बहुत कालानें एक उपजतच मुका, बहिरा दुर्गन्धियुक्त मुलगा झाला. त्याची माता कमला ह्मणाली 'मला किंवा याला विधि मरण कां देत नाहीं!' राजानें प्रथम विवेक केला व मुलाचें नांव दक्ष ठेवलें पण बारा वर्षें तप करवून गुण नाहीं; ह्मणून त्यानें मायलेंकरांस हांकून दिलें. तीं गांवोगांव हिंडत असतां एका पवित्र ब्राह्मणाच्या अंगावरून आलेल्या वायूच्या स्पर्शानें दक्षाची कान्ति दिव्य झाली, या ब्राह्मणाचा शोध लागावा म्हणून चौकशी करतां एकानें यास गजाननाची आराधना करावयास सांगितली. त्याप्रमाणें केली असतां दक्षास गजानन प्रसन्न झाला व मी तुला वर देण्यास तयार आहें परंतु माझ्या भक्तानें दिलेला वरा. त्याचें नांव मुद्‌गल. तो तुला वर देईल असें ह्मणून गुप्त झाला.

विनायक कोठें गेला ? असें भेटल त्या मनुष्यास व दिसेल त्या वृक्षास विचारीत वस्त्राचें भान न राहतां दक्ष हिंडूं लागला. श्रमून श्रमून भूवर निश्चेष्ट पडला. तों स्वप्नांत त्यास मुद्‌गल दृश्य होऊन ह्मणाला, "विनायकाजवळ इच्छिलेले वर मी तुला दिले." जागा होऊन त्यानें मुद्गलाचा शोध लावला. त्यानें मंत्रोपदेश दिला व तुझी इच्छा तृप्त होईल असें तो म्हणाला.

दक्षानें बारा वर्षें जप केल्यावर हत्तीनें गळ्यांत माळ घातली असें स्वप्न पाहिलें. मातेला विचारतां हें शुभ चिन्ह आहे असें ती ह्मणाली व तिचें म्हणणें पुढें खरें ठरलें.

कौंडिन्य नगरांत चंद्रसेन नांवाचा राजा होता. तो कर्मानुसार निपुत्रिकावस्थेंत मृत्यु पावला. राणी व मंत्री शोकाविष्ट झाले. तेव्हां एक ब्राह्मण पुढें झाला व त्यांची समजूत घालून म्हणाला "राजाची प्रेतसंस्कृति धर्मपुत्राकडून करवावी व सर्वांनीं तिलांजलि द्यावी." सुमन्तुनामक प्रधानानें क्रिया केली व राणीला राजवस्त्रें दिलीं. परंतु राणी व मंत्री प्रजापालनकार्याविषयीं साशंक झालीं तेव्हां तेथें मुद्‌गल मुनि आले व म्हणाले "राजाचा गहननामक जो महागज आहे त्याच्या सोंडेंत पुष्कर माला द्यावी व मोठ्या समाजांत ज्याच्या गळ्यांत तो माळ घालील त्याला राजा करावा." त्याप्रमाणें शुभदिवशीं हत्तीला माळ देऊन त्याला समाजांत सोडण्यांत आलें. त्याच्यापुढें अनेक स्त्रियांनीं आपले पति व पुत्र ठेवले. जन पंक्तीकरून उभे राहिले; पण नगराबाहेर जाऊन हत्तीनें दक्षास माळ घातली. मंत्र्यासह दक्षानें त्याच हत्तीवर बसून नगरप्रवेश केला. तितक्यांत मुद्‌गल तेथें आशीर्वाद देण्यास आले ही वार्ता ऐकून

दक्षाचा बाप त्याला येऊन भेटला व स्वप्नगत दृष्टान्त झाल्यावरून वीरसेन राजानें आपली कन्या दक्षास अर्पण केली.

भीमराजानें प्रश्न केल्यावरून दक्षाचें पूर्ववृत्त विश्वामित्रानें सांगितलें.

## दक्षाचें पूर्ववृत्त

सिंधु देशांत पल्लीनामक नगरांत कल्याण नामक वैश्य व इन्दुमतिनामक त्याची पत्नी हीं ईश्वरभक्तिपूर्वक नांदत होतीं. त्यांस एक पुत्र झाला त्याचें नांव त्यांनीं बल्लाळ ठेविलें. तो पुढें बाळपणीं देवपूजेचा खेळ मुलांसमवेत करी. आमचीं मुलें तुझ्या मुलानें बिघडवलीं अशी तक्रार लोकांनीं वैश्याकडे केली.

मुलानें वनांत बांधलेलीं खेळांतलीं मंदिरें मोडून पित्यानें त्याला मार देऊन बांधून ठेवलें. बल्लाळानें गणेशाचा धांवा केला व माझी पूजा मोडणारा अंधबधिर होवो म्हणोन शाप दिला. त्याची भक्ति पाहून गजानन प्रकट झाला व तुझा शाप खरा होईल असें म्हणाला. त्याप्रमाणें कल्याण वैश्याचा देह कुत्सित झाला. इंदुमतीला घडला प्रकार कळतां शोक करीत ती पुत्राकडे गेली तेथें तिला पूजेंत मग्न असा तिचा मुलगा गणपतीच वाटला. पुत्राची काकळूत करून तिनें उश्शाप मागून घेतला. बल्लाळ म्हणाला, पुढल्या जन्मीं कल्याण हा कुत्सितांग होईल व तूं त्याची माता होशील. गणेशभक्त अशा एका द्विजाच्या हातून त्याचा देह दिव्य होईल. त्याप्रमाणें इंदुमति कमला झाली व कल्याण दक्ष झाला.

भक्ताचा महिमा गातां ब्रह्मदेवानें भीमराजाचा पुत्र जो रुक्मांगद त्याची गोष्ट सांगितली.

## रुक्मांगदाची गोष्ट.

रुक्मांगद हा गुरुघरीं जाऊन सुविद्य झाला तें पाहून त्याला पित्यानें पट्टाभिषेक करविला. तोही गजानन भक्त होता. मृगया करीत असतां तृषार्त होत्साता वाचक्नवि मुनीच्या आश्रमांत शिरला व " माते! मला पिण्यास पाणी दे अशी त्यानें मुकुन्दानामक वाचक्नवीच्या पत्नीस प्रार्थना केली. " तिची बुद्धि पापिष्ठ आहे हें पाहून मी गजानन भक्त आहें असें सांगून तिला रुक्मांगदानें झिडकारिलें. तुला कोड होईल म्हणून तिनें राजाला शाप दिला. त्याबरोबर त्याचें शरीर पांढरें झालें. तें पाहून राजा प्रायोपवेशन करून वटवृक्षाखालीं बसला. तों नारदमुनि आले. सर्व वृत्त ऐकून घेऊन ते म्हणाले, विदर्भ देशांत कदंब गांवीं चिंतामणि सरोवरांत स्नान करून गणेशपूजा कर. तेथें एका

यात्रेकरूला दिव्यदेहाची व मुक्तिची प्राप्ति विलंबाविणें झाली रुक्मांगदानें आणखी कोणास सिद्धि प्राप्त झाली असा प्रश्न केल्यावर नारद म्हणाला, अहिल्येला कपटरूपानें भ्रष्ट केलें म्हणून तिचा पति जो गौतम त्यानें इंद्राला शाप दिला. तेणें करून इंद्राला भगरोग जडला. देवांच्या मध्यस्थीवरून गौतमानें उःशाप दिला व इंद्रास या चिंतामणि तीर्थांत स्नान करावयास व गणेश मन्त्रांचा जप करावयास सांगितला. यथोपदिष्ट स्नान व जप केल्यावर इंद्र व्याधिमुक्त झाला. त्याप्रमाणें स्नान करतां रुक्मांगद व्याधिमुक्त झाला. तें पहातां त्याच्या सर्व सेनेनें स्नान केलें. त्या सर्वांस न्यावयास विमान आलें. परंतु मी पितरांना घेतल्याशिवाय येणार नाहीं असें रुक्मांगद म्हणाला. त्याचा निश्चय पाहून भीम व चारुहासिनी यांसही विमान आलें.

नंतर मुकुंदेचें काय झालें असा प्रश्न केल्यावरून ब्रह्मदेव म्हणाले. रुक्मांगद गेल्यावर मुकुंदेची झालेली स्थिति इंद्रास कळल्यावरून इंद्र रुक्मांगदाचें रूप धरून आला व तिच्याशीं क्रीडा करून परत गेला. मुकुंदा पुढें पुत्र प्रसवली. स्त्रीचें कपट मुनीला माहित नसल्यामुळें त्यानें त्याचें आनंदानें जातकर्म केलें व नांव गृत्समद ठेविलें. पांचवें वर्षीं व्रतबंध करून त्याला वेदनिष्णात केला. पुढें मागधाधिपानें आपल्या घरीं वसिष्ठ व अत्रि यांबरोबर गृत्समदास श्राद्धाचें आमंत्रण दिलें. तेथें गेल्यावर तो शुद्धमनाचा गृत्समद आपली प्रौढी सांगूं लागला म्हणून अत्रिनें त्याचा धिक्कार केला व त्याचें खरें कारण सांगीतलें. त्याचा शहानिशा त्यानें मातेच्या तोंडी करून घेतला. त्यानें कोपानें मातेला शाप दिला कीं तूं वनांत बोरी होशील व तिनें त्याला परत शाप दिला कीं तुला त्रैलोक्यतापदायक पुत्र होईल. गृत्समद खालीं मान घालून वनांत गेला व इंद्रियें, मन व श्वास यांचा निरोध करून स्थाणुसारखा निश्चल उभा राहून त्यानें तप केलें व गजानन प्रसन्न होतांच ब्राह्मणत्व मागून घेतलें; तेव्हांपासून त्याला वसिष्ठादि मुनी मान देऊं लागले व यज्ञकर्मांत घेऊं लागले.*

## त्रिपुरासुराची गोष्ट

ब्रह्मदेव गृत्समदाचें वृत्त पुढें सांगत असतां म्हणाला. एकदां गृत्समद मोठ्यानें शिकला. तीपासून एक असुर जन्मास आला. पित्यानें दिलेल्या मंत्राच्या जपानें गण-

---

* सर्व भूतांवर समदृष्टि ठेवणें हा समाजसमतेचा वैष्णवांचा जसा संप्रदाय आहे तसा गणेशाचा संप्रदाय दिसतो. तपःसामर्थ्यावर गृत्समद आपल्या जन्मांतील अशुद्धि निर्मूल करूं शकला तर विश्वामित्र तपःसामर्थ्यावर क्षत्रियाचा ब्राह्मण झाला यांत नवल नाहीं.

पति प्रसन्न झाला असतां त्यानें वर मागितला " मला त्रैलोक्य जिंकण्याचें सामर्थ्य व मुक्ति दे." गणपति म्हणाला "तसें होवो. मी तुला सोन्याचीं तीन पुरें देतों. त्यांचा भंग शंकर एका बाणानें करील तेव्हां तुला मुक्ति मिळेल." असुराचें नांव त्रिपुरासुर पडलें.

प्रथम त्रिपुरानें इंद्राला जिंकलें. याच्या भीतीनें ब्रह्मदेव व विष्णु स्थान सोडून गेले. शंकराला मात्र त्रिपुरानें तपाच्या योगानें प्रसन्न करून घेतलें. आणि तूर्त त्याला मंद-राचलीं जावयास विनंति करून कैलास हस्तगत करून घेतला. नंतर पाताळ जिंकि-ल्यांवर देव व मुनि यांस कोंडून अधर्म मातविला. त्रिपुर मरेल कसा या चिंतेंत देव व मुनि पडले असतां नारदानें येऊन त्यांस सांगितलें कीं तुम्हीं गणपतीस प्रसन्न करून घ्या. देवांनीं जप केला. गणपति प्रसन्न झाला व त्रिपुराचा वध करण्याची व्यवस्था करतों असें म्हणाला.

नंतर गणेश त्रिपुराकडे ब्राह्मणरूपानें जाऊन म्हणाला. " माझें नांव कलाधर. नांवाप्रमाणें माझी कला तर पहा. " असुर म्हणाला, " तुझी कला दाखव म्हणजे मागशील तें देईन. " कलाधरानें बाणांवर रचलेलें त्रिपुर दिलें व म्हणाला मला शंकरा-जवळ गजाननाची मूर्ति आहे ती आणून दे.

सामोपचारानें मागितली असतां ती मूर्ति शंकर देईना म्हणून त्रिपुरानें शंकराशीं युद्ध मांडलें. पार्वती हिमालयांत दडाली. शंकराचा पराभव करून त्रिपुरानें मूर्ति हरण करून नेली; पण ती पाताळांत नेत असतां गुप्त झाली.

पुढें नारदानें शंकरास सुचविलें " गणपतीस प्रसन्न करून घे आणि युद्धास जा. " शंकरानें जपतप करतांच गणपतीनें प्रसन्न होऊन सांगितलें. " माझ्या नामबीज मंत्रानें बाण मंत्रून सोड व त्रिपुरांचें भस्म कर आणि असुरास मार." गणपतीनें शंकरास सहस्रनाम दिलें. त्याच्या सामर्थ्यावर शंकरानें पुन्हां युद्ध केलें. त्यांत त्रिपुर कार्तिकी पौर्णिमेला मृत्यु पावला.

नंतर पार्वतीची व शंकराची भेट कशी झाली तें सांगतांना ब्रह्मदेव म्हणाला. एक सुंदर स्त्री एकटी घोर अरण्यांत आक्रोश करीत आहे असें धीवरानें हिमालयास सांगितलें. येऊन पहातो तों ही आपली कन्या शिवविरहानें रडत आहे असें समजतांच हिमालयानें तिला चतुर्थीचें व्रत–( श्रावण शुद्ध चतुर्थीपासून भाद्रपद शुद्ध चतुर्थी-पर्यंत ) करावयास सांगितलें. तें केल्यानें पार्वतीला शंकराची भेट झाली.

हें व्रत पूर्वी कोणी कोणी केलें याचा शिव व स्कंद यांच्या संवादांतील सर्व वृत्तान्त हिमालयानें सांगितला.

## कर्दमाची गोष्ट

पूर्वजन्मीं गणेश चतुर्थीचें व्रत आचरल्यानें कर्दम नामक नृपतीस निष्कंटक राज्य कुबेरासारखी संपत्ति, त्रैलोक्यामध्यें असलेल्या उत्तम पदार्थांची प्राप्ति, असें वैभव प्राप्त झालें व पुन्हा याजन्मीं तेंच व्रत केल्यानें तो ज्ञान आणि वैराग्य यांनीं युक्त होऊन यथेच्छ सुख भोगून पुत्राला राज्यावर स्थापून गणपतीच्या तेजांत जाऊन मिळाला, तो पुन्हां परत आला नाहीं.

त्याच प्रमाणें निषधपुरांतील राजा नल यास ऐश्वर्य व सिद्धि प्राप्त झालीं.

## चंद्रांगदाची गोष्ट.

मालव देशांतील कर्णपूरचा चंद्रांगदराजा मृगया करीत असतां राक्षसीच्या भयानें, सरोवरांत उडी मारल्यावर नागकन्यांच्या हातांत सांपडल्यामुळें त्याला प्रखर बंधन प्राप्त झाल्यानें बारा वर्षें पर्यंत स्त्रीविरह दुःख सोसावें लागलें. परंतु राणी इन्दुमतीनें गजाननाचें चतुर्थीचें व्रत केल्यामुळें दोघांचा संयोग झाला. ( खं. १ अ. ५३ ) संकष्टीच्या व्रतानें भृशुंडीच्या पितरांचा उद्धार झाला. ( खं. १ अ. ५८ ) कृतवीर्याला पुत्रप्राप्ति झाली. ( खं. १ अ. ७१ व तो पुत्र ( कार्तवीर्य ) अंगविकल होता. त्याचा देह याच व्रतानें दिव्य झाला. हाच पुढें सहस्रार्जुन म्हणून प्रसिद्ध झाला. (खं. १ अ. ७३) गजानन स्वरूप प्राप्त झालेल्या भृशुंडीच्या दर्शनाहून परत येत असतां शूरसेनाच्या राज्यांत इंद्राचें विमान एका कुष्ठ रोग्याची दृष्टि त्यावर पडतांच खालीं उतरलें व अंतरिक्षीं संचार करण्यास असमर्थ झालें तें संकष्टीव्रत चुकून हातानें घडलेल्या चाण्डाळणीची दृष्टि त्यावर पडतांच वर उठलें व चालू झालें. हा चमत्कार पाहून हें व्रत शूरसेनानें केलें व प्रजेसह विमानांत बसून गणपतीकडे निघाला. परंतु त्यांत एक कुष्टी* होता. त्याच्यामुळें विमान हलेना. दूतांच्या सांगण्यावरून चार अक्षरी मंत्राचा जप त्याच्या कानांत राजानें केला, त्याचा देह दिव्य झाला व विमान वर उठून चालू झालें.

शूरसेनानें विचारल्यावरून इंद्रानें भृशुंडीचें पूर्वजन्मवृत्त सांगितलें. " दण्डकारण्यांत नामा म्हणून एक कोळी होता. तो मार्गस्थांस लुटून व पशुहत्या करून निर्वाह करी. मृगयेच्या श्रमानें एका तीर्थावर स्नान करून बाहेर येतो तों त्याला मुद्‌गल मुनि भेटला. त्यावर तरवार उपसून नाम्या धांवला. पण ती हातांतून गळाली. त्याची बुद्धि पालटली व मला संसारांतून काढा असें मुद्‌गलास म्हणाला. मुद्‌गलानें करां-

* हा पूर्व जन्मीं बुध होता. त्याचीच गोष्ट पुढें गोष्टींच्या प्रकारणांत दिली आहे.

तील यष्टि जमिनींत पुरली व उपाय म्हणून श्रीगणेशायनमः हा जप परत येई तों अथवा यष्टीस अंकुर फुटेतों, करावयास सांगितला. मुनि परत आला तेव्हां नाम्यावर वारुळ वाढलें होतें. मुनि ह्मणाला " तूं भ्रूशुण्डी म्हणून प्रसिद्ध होशील. " कारण भ्रूम-ध्यून त्याला शुण्डा फुटली होती. इंद्रादि देव दर्शनास आले व सायुज्यता प्राप्त होईल असा वर गणपतीनें दिला.

पृथ्वीसुत मंगळ, यानें हें व्रत केलें व गजानन प्रसन्न करून घेतला. त्याला अवन्तीचें राज्य व स्वर्गवास मिळाला. आणि तेव्हां पासून मंगळवारीं पडणाऱ्या संकष्टी चतुर्थीचा महिमा वर्षभर केलेल्या चतुर्थीच्या व्रतावरोवर झाला.

## चंद्रशाप

संकष्टीच्या दिवशीं चंद्राचा महिमा एवढा कां तें सांगतांना ब्रह्मदेव म्हणाला मीं कैलासीं असतांना नारदानें शंकराला एक फळ दिलें. तें षडाननानें मागितलें तसेंच गणपतीनें मागितलें. मी ह्मटलें लहान जो कुमार त्याला द्यावें. पुढें गजाननें माझ्या सृष्टि उत्पन्न करण्याच्या कामांत विघ्न आणलें. मी घोटाळलों अशा स्थितींत आम्हांस पाहून चंद्र हंसला. म्हणून गजाननानें शाप दिला कीं त्रैलोक्यांत तुला जो पाहील त्याला पाप लागेल. चंद्र असा अदृश्य झाला तर आपत्ति कोसळेल म्हणून देव मध्यें पडले. चंद्रानें एकाक्षरी मंत्रांचा जप केला. तेव्हां गणेशानें उश्शाप दिला कीं तूं भाद्रपद शुद्ध चतुर्थीस दर्शनास अयोग्य असशील पण संकष्टी चतुर्थीस पूज्य होशील.

## दुर्वामाहात्म्य.

दुर्वांनीं गणपतीची पूजा कां करतात असा प्रश्न केल्यावरून ब्रह्मदेवानें गोष्ट सांगि-तली ती अशीः—एक चांडाळीण गवत पेटवून देवळाशीं शेकत असतांच तेथेंच एक बैल व गाढव हे त्यांतील गवत खात असतां त्यांतील दुर्वांकुर वाऱ्यानें उडून गणपति चरणीं पडले असतां गणपतीनें मान्य केले. कौंडिन्यानें आपल्या आश्रयानामक स्त्रीस सांगितलेली दुसरी गोष्ट सांगितली ती अशी. एकदां ज्वालासुर सर्वांस त्रास देऊं लागतांच गणपतीनें त्यास गिळून उदरीं सांचविलें. परंतु उदरांत दाह उत्पन्न झाला तो कशानें शमेना पण हजारों मुनींनीं एकवीस एकवीस दुर्वा गणपतीच्या शिरीं वाहिल्या तेव्हां त्याचा दाह शमन पावला. दुर्वा महात्म्याविषयीं तिसरी गोष्ट सांगितली ती अशी. जनकाचा गर्व भंग करण्याकरतां गजानन रक्त रोग्याचें सोंग घेऊन त्याकडे जाऊन खावयास मागूं लागला. तो जें जें देई तें तें गजानन भक्षण करून टाकी.

शेवटीं तो एका दरिद्री ब्राह्मणाच्या घरांत जाऊन त्यानें भक्तीनें दिलेले दुर्वांकुर खाऊन तृप्त झाला.

ही गोष्ट ऐकून आश्रयेला संशय आला असें वाटल्यावरून कौंडिन्यानें एक दुर्वांकुर घेऊन इंद्राकडे जाऊन भार भार सोनें माग म्हणाला. इंद्रानें आश्रयेला कुबेराकडे पाठविली. कुबेरानें आणखी कां मागत नाहीं असें म्हणून सोनाराच्या ताजव्यांत घालून दुर्वा सोन्यावरोबर तोलली. घातलेल्या सोन्यास तो ताजवा पुरेना. वाण्याची तागडी अपुरी पडली. तेल्याची अपुरी पडली. घट बांधला तरी पुरा पडेना. इंद्रादि देवांनीं भार घातला तरी पुरा पडेना. देवर्षि गणपतिस्तवकरून परत गेले. शेवटीं आश्रयेनें गणपतीची दुर्वांकुरानें पूजा केली व पतिवाक्याचा अनादर केल्यावद्दल आपली निंदा केली. पुढें संकष्टीचें व्रत कोणी कोणी केलें तें सविस्तर ब्रह्मदेवानें सांगितलें. स्कंदाकरतां पार्वतीनें केलें; अनिरुद्धाला चित्रलेखेनें नेलें असतां रुक्मिणीनें केलें; बाणासुरास जिंकण्यापूर्वीं कृष्णानें केलें; अगस्तीनें समुद्र आटवण्यापूर्वीं केलें; परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी करण्यापूर्वी केलें; तारकासुराला मारण्यापूर्वीं षडाननानें केलें; शंकरानें मदन जाळल्यावर रतीनें मदनाला अंगत्व प्राप्त होण्यास केलें. अनंग मग प्रद्युम्न म्हणून रमेच्या पोटीं आला.

क्रीडाखंडामध्यें गणेशाच्या क्रीडा वर्णन केलेल्या आहेत म्हणून त्याखंडास क्रीडाखंड हें नांव दिलेलें आहे. त्यांत गणेशाच्या अवतारांचें व त्यानें केलेल्या कार्यांचें वर्णन देऊन ब्रह्मदेवानें व्यास मुनींच्या चवथ्या व पांचव्या प्रश्नास उत्तर दिलें आहे.

कश्यपाची स्त्री अदिति हिला इच्छा झाली कीं आपल्या पोटीं परमेश्वर जन्मास यावा. प्रेमळ पतीनें दिलेल्या पंचाक्षरी मंत्राच्या जपानें तिनें गणपतीस प्रसन्न करून घेतलें व तुझ्या पोटीं अवतार घेईन असें त्यानें वचन दिलें.

इकडे रुद्रकेतूला शारदा नामक स्त्रीपासून दोन जुळे पुत्र झाले. त्यांचीं नांवें देवांतक व नरांतक अशीं ठेवण्यांत आलीं. यांनीं शंकराची आराधना करून देव मानवांपासून अभय, त्रैलोक्याचें राज्य, व गजानन चरणीं भक्ति इ० मागून घेतलीं.

देवांतक स्वर्लोक जिंकून इंद्रपदीं बसला. विष्णु स्वस्थानाहून पळाला. नरांतकानें भूलोक व पाताळ जिंकलें व जागजागीं राक्षस अमलदारांची नेमणूक झाली. पृथ्वी दैत्यभराक्रान्त होऊन ब्रह्मदेवाला शरण गेली व दोघांनीं परमेश्वराची स्तुति केली तेव्हां आकाशवाणीनें त्यांस कळविलें कीं कश्यपाच्या घरीं परमेश्वर अवतार घेईल. त्याप्र-

माणें अदितीला पुत्र झाला. त्याचें नांव महोत्कट ठेवून कश्यपानें उत्सव केला. महोत्कट सर्वत्र कश्यपनंदन म्हणून प्रसिद्ध झाला. त्याला नाहींसा करण्याकरतां राक्षस निरनिराळीं रूपें धरून येऊं लागले. अदिति यज्ञसंभारांत गुंतली असतां व मुनि स्नानास गेला असतां विरजा राक्षसणीनें मुलाला येऊन गिळिलें. जिकडे तिकडे हाः हाः कार उडाला. परंतु पहातात तों कश्यपनंदन तिच्या पोटांत वाढूं लागला व तिचें पोट फाडून बाहेर आला व विरजा मृत्यु पावली.

उद्धत व धुरंधर नांवाचे राक्षस पोपटरूपानें येऊन आश्रमांत शिरले. बालकानें त्यांस खेळावयास धरिलें. पोपट त्यास चोंचीनें प्रहार करूं लागतांच बालकानें त्यांस आपटून मारलें.

तुंबरु आदिकरून कश्यपाकडे पाव्हणे आले. पंचायतनाच्या पूजेला बसून ध्यान करूं लागतांच बालकानें देव नाहींसे केले. ध्यान सुटतांच पाहतात तों देव नाहींत. बापानें सांगितलें मुला देव आणून दे. मुलगा आईला म्हणाला मी देव गिळले नाहींत. असतील तर मी आ केला आहे पहा. तिला आंत विश्वरूप दिसलें. अतिथींस पांची देव बालकांत दिसले. सर्वांनीं बालकाची स्तुति केली.

अशा क्रीडा सहावर्षें चालल्या होत्या. सातव्या वर्षी काशीराजा आश्रमांत आला व मुलाच्या लग्नाकरतां कश्यपनंदनास कश्यपाच्या अनुज्ञेनें बरोबर घेऊन नगरास निघाला. वाटेंत धूम्राक्ष राक्षसाला बालकानें मारलें. त्यावरून नरांतकानें मुनिपुत्रास राजाच्या रथाला बांधून आणण्याची राक्षसाला आज्ञा केली. नगरप्रवेश झाला तोही राक्षस मारल्याशिवाय झाला नाहीं.

एक दिवस लोक निद्रित असतां ज्वालामुख, दारुण, व व्याघ्रमुख राक्षस आले. ज्वालामुखानें नगरास आग घातली. दारुणानें वादळ उठवून आग वाढविली व व्याघ्रमुख उघड्या सुरक्षित जागेंत आ पसरून बसला. निवाऱ्याची जागा म्हणून लोक विवरांत शिरावयास लागले. परंतु विनायक आंत शिरे तों असुरानें जबडा मिटला नाहीं. विनायक आंत शिरतांच जबडा मिटला. विनायकानें त्याचें पोट फाडून त्यास मारिलें. लोक मुक्त केले, अग्निप्राशन केलें दुसऱ्या दोघां राक्षसांस मारिलें व लोकांस सोडविलें. सर्वांस आनंद झाला.

ह्याप्रमाणें विनायकानें आपले पराक्रम दाखविणाऱ्या व देवत्व पटवून देणाऱ्या पुष्कळ क्रीडा चालविल्या त्या सांगून विषय निघाल्यावरून अनायासानें मिळालेलें

पण दृढभाव धरून समर्पण केलेल्या शमिपत्रानें गणपति संतुष्ट कसा होतो त्याविषयीं ब्रह्मदेवानें गोष्ट सांगितली.

## शमीचा महिमा.

वामनानें स्थापलेल्या गणपतीवर व्याध राक्षसाला भिऊन शमीवृक्षावर चढला असतां धक्का लागून शमीची डाळी पडली व्याध मुक्त झाला. तेव्हांपासून शमीचें महत्व वाढलें.

नंतर वामनानें गजाननास प्रथम प्रसन्न करून कसें घेतलें व तो बलीस पाताळांत कसा स्थापन करूं शकला ती गोष्ट ब्रह्मदेवानें सांगितली व इतर गोष्टी सांगितल्या.

## दुरासदवध.

पार्वतीच्या पोटीं गणपतीनें जन्म घेऊन शंकराच्या वरानें उन्मत्त झालेल्या भस्मासुरपुत्रास–दुरासदास–मारिलें.

## नरांतकवध.

नरांतकाशीं काशीराजाचें युद्ध झालें त्यांत विनायकानें साहाय्य केलें व नरांतकास मारिलें.

## देवांतकवध.

नंतर देवांतकानें काशीराजाच्या नगरास वेढा दिला. घनघोर युद्ध झालें. शुक्राचार्य मृत दैत्यांस जीवंत करी. त्यास ईशितिनें बर्बर देशांत नेऊन सोडिलें. देवांतकानें कांहीं अघोर प्रकारानें अग्निची पूजा केली. पांच प्रेतांवर बसून मांडीच्या मांसाचा बळि दिला व पुत्राच्या मस्तकाची आहुति दिली. अग्नि प्रसन्न झाला व पुत्रास सजीव केलें. कुण्डांतून वारू निघाला त्यावर बसून देवांतक युद्धास निघाला. देवान्तक व विनायक यांनीं एकमेकांवर विरुद्ध स्वभावाचीं अस्त्रें सोडिलीं. देवांतकानें गजास्त्र आणि विनायकानें सिंहास्त्र सोडलें. देवान्तकानें रुद्र पुरुष उत्पन्न केला त्याशीं विनायकाच्या सिद्धी लढूं लागल्या. दैत्यांनीं मायावी अर्थिति निर्माण करवून ती त्यांच्या हातीं सांपडून धांव धांव म्हणत आहे असें दाखवून विनायकास फंसवावयाचा घाट घातला तरी विनायकानें देवांतकास मारिलें. त्याच्या देहांतील ज्योति विनायकाच्या शरीरांत मग्न झाली. याप्रमाणें सर्व विघ्नें नष्ट झालीं. काशीराजाच्या मुलाचें लग्न झाल्यावर विनायक आश्रमीं आला व पितरांच्या आज्ञेनें अवतारकार्य संपल्यानें सत्यलोकास गेला.

हें कृतयुगांतील अवतारकाय झालें. याचप्रमाणें त्रेतायुगांत सिंधुदैत्याला मारावयास गजाननानें गिरिजेच्या घरीं मयूरेश्वराचा अवतार घेतला. मैथिलेय राजा चक्रपाणि म्हणून होता. त्याला त्याची उग्रानामक स्त्री होती. तिच्या पोटीं हा दैत्य सूर्यप्रसादानें झाला होता. तो सूर्याच्या आराधनेनें वर प्राप्त झाला असतां मत्त झाला होता.

## सिंधुवध.

या खेपेस सुद्धां कांहीं असुर गृध्राचें व मूषकाचें रूप घेऊन मयूरेश बालक असतां त्यास मारावयास आले. पण मयूरेशानें त्यांसच मारिलें. व्योमासुर व त्याची भगिनी यांचा प्राण बालकानें घेतला. प्रथम दर महिन्यास अशी पीडा झाली. पुढें वर्षानुवर्ष राक्षस त्रास देऊं लागले. मयूरेशानें एकदां जांभई देतांना पार्वतीस मुखांत विश्वरूप दाखविलें.

बालक मुनिपुत्रांसह देवदैत्य युद्धाचे खेळ करूं लागला. मुनिपुत्रांसह मयूरेश बागेंत गेला. तेथें कूट राक्षसानें विहिरींत विष कालविलें. पाणी पितांच मुलें गतप्राण झालीं. वरून पक्षी उडत ते मरून पडत. मयूरेशानें कूटास मारलें व मुलें व पक्षी उठविले. गुणेश मुलें घेऊन खेळावयास दूर गेला. गौतमाश्रम पाहिला. भूक लागली म्हणून त्यानें मुलांस आश्रमांत भात शिजलेला होता तो जेवावयास सांगितला. अहिल्या रागावली कारण नैवेद्य झाला नव्हता. गौतमानें गुणेशाला ओळखलें व पोरखेळ करतोस म्हणाला व गौरीकडे घेऊन गेला. तिनें त्यास बन्धन केलें पण गुणेश मोकळा होऊन बाहेर आला.

विश्वकर्म्यानें मयूरेशाला आपल्या करामतीचीं म्हणून तेजस्वी आयुधें आणून दिलीं. एकदां अश्वरूपानें राक्षस आला. मुलें व गुणेश झाडावर चढलीं. त्यांस सरोवरांत पाडलें. गुणेशानें राक्षसास मारलें व मुलांस बाहेर काढलें व आपण जलक्रीडा करण्यास सरोवरांत गेला. इकडे भगासुर आला व मार्गांत निजला. गुणेश वर नाहीं म्हणून शोकानें अन्ध झालेले मुनिपुत्र त्याच्या मुखांत नेमके शिरले. गुणेशाचा धांवा त्यांनीं करतांच गुणेश वर आला. भगासुरास मारून मुलांस मोहनिद्रा आणून ठेविलीं. व मुलांचे आईबाप वाट पहात असतील ह्मणून आपण प्रत्येक मुलासारखें रूप धरून घरोघर गेला व पुन्हां सरोवरांत गेला. तेथें नागकन्यांनीं वासुकीकडे नेला. त्याच्या फेडवर नाचून त्याचा मणि घेऊन आला व त्यानें मुलांस उठविलें. तीं घरोघर गेलीं. तेव्हां घरांत आहेत हीं मुलें कुठलीं असा गुणेशाच्या मायेनें मोह सर्वांस पडला. पुढें कांहीं राक्षस मारल्यावर सिंधु दैत्याशीं लढण्याचा प्रसंग आला. त्यांत सिंधु मारला गेला.

सिद्धिबुद्धीनें गुणेशाला वरल्यावर गुणेश पार्वतीला ह्मणाला आमचें कार्य झालें. आम्हीं निजधामास जातों. पार्वती शोक करूं लागली. तेव्हां गुणेश म्हणाला "मी द्वापरयुगांत पुन्हां सिंदुराला मारावयास तुझ्या पोटीं अवतार घेईन."

## सिंदुरासुरवध.

ब्रह्मदेवाच्या जांभई पासून एक पुरुष उत्पन्न झाला. तूं कोण विचारतांच तुझा पुत्र म्हणून सांगितलें. ब्रह्मदेवानें त्याचें नांव सिंदूर ठेवलें. त्यास वरदान दिलें कीं तूं ज्यास क्रोधानें आलिंगन देशील त्याचे तुकडे होतील. तूं देव दानवांत, सजीव निर्जीवांत निर्भय राहशील. सिंदुराला वाटलें हा बोलतो हें खरें कशावरून. तेव्हां याच्यावरच या वराचा प्रयोग करून पहावा. ब्रह्मदेवाचे हा पाठीस लागतांच ब्रह्मदेव म्हणाला पुत्रस्नेहानें तुला वर दिला तो तूं मलाच अपकार करूं लागलास. तूं दैत्य होशील व गजानन तुला मारील.

ब्रह्मदेवानें विष्णूचें साहाय्य मागीतलें. विष्णु सिंदुरास म्हणाला. "अरे! तूं ब्रह्मदेवासारख्या ब्राह्मणाशीं आपलें वीर्य फुकट दाखवीत आहेस. मी तर बोलून चालून सत्वगुणी पृथ्वीचें रक्षण करतों. तूं, तमोगुणी शंकराला पराक्रम दाखिव." सिंदूर एकदम शंकरापाशीं पातला व पार्वतीला पहातांच युद्ध न करतां तिला उचलून नेऊं लागला. पार्वतीनें मयूरेशाचें चिंतन केलें. गुणेश प्रकट होऊन म्हणाला "हे दैत्या तूं या त्रैलोक्य जननीला मजजवळ ठेव, प्रथम शंकराशीं युद्ध कर, त्याला जिंक व मग हिला ने." युद्धांमध्यें हैराण होतां दैत्यानें पाय काढला.

पार्वतीनें गुणेशाला कोण ह्मणून विचारतां ह्मणाला "मी मयूरेश सिंदुराला मारण्यास तुझ्या उदरीं येईन."

इकडे सिंदुरानें भूलोकीं कहर केला. देव, यक्ष मुनि, किंनर या सर्वांनीं विनायकाची स्तुति केली. गजानन प्रसन्न होऊन म्हणाला मी सिंदुरास मारावयास पार्वतीच्या पोटीं जन्म घेईन त्याप्रमाणें पार्वती पुत्र प्रसवली. परंतु शुंडायुक्त बालक पाहून तिला मनांत आश्चर्य वाटलें. शंकर म्हणाला परमेश्वर दुष्ट दैत्यांस मारावयास हवें तें रूप घेतो. हा सिंदुराला मारील. गजानन ह्मणाला "वरेण्य माझा भक्त आहे. त्याच्या पोटीं येईन असें त्याला वचन दिलें आहे. त्याच्या पुष्पिकानामक स्त्रीच्या कुशींतून त्यांना झालेलें बालक राक्षसांनीं हिरावून नेलें आहे. मला नेऊन तिच्या कुशींत ठेवा." नंदीला पार्वतीची आज्ञा होतांच त्याप्रमाणें त्यानें केलें. पुष्पिकेनें हें अद्भुत बालक वनांत सोडिलें तें पराशर मुनीनें वाढविलें.

इकडे सिंदुरापाशीं कोणी युद्धास उभा रहात नव्हता; म्हणून त्याला आपलें पौरुष व्यर्थ वाटावयास लागलें होतें. गजाननानें कळविलें "मी तुला मारावयास जन्मास आलों आहें" दोघांचें घनघोर युद्ध होऊन सिंदूर मरण पावला. वरेण्यानें पुत्रत्याग केल्याबद्दल क्षमा मागितली. गजानन म्हणाला पूर्वी तप करून तूं पुत्र हो एवढाच वर मागितलास पण आतां मी मोक्षोपाय सांगतों. हाच उपदेश गणेशगीतेचा विषय झाला. तो पुढें तत्त्वज्ञान प्रकरणांत आला आहे.

गणेशाचे तीन युगांतील तीन अवतार झाले त्याचा आतां चवथा अवतार या कलियुगांत होणार आहे. तेव्हां प्रथम फार दुःखाचा काल येईल.

## कलियुग.

कलियुगांत लोक मुख्यतः आचार भ्रष्ट होतील. देवांचें भजन टाकून इंद्रियतर्पण करूं लागतील. वर्णाश्रमधर्म पाळणार नाहींत. वर्णसंकर मातेल. देवस्थानें व तीर्थें गुप्त होतील. लोक शिवाय असत्यवादी होतील. बलाढ्य दुर्बलाचें धन हरण करतील. शपथा वाहतील. खोट्या साक्षी देतील. धन घेऊन अणुभर सुद्धां घेतलें नाहीं म्हणतील. धर्म केवळ द्रव्यरूप होईल. सज्जनांचा उच्छेद व दुर्जनांचा उत्कर्ष होईल. मेघ वृष्टि करणार नाहींत. पृथ्वी धान्यहीन व वृक्ष रसहीन होतील. प्रजा अल्पायु होतील. सोळावें वर्ष हें सर्वांत अधिक आयुष्य होईल. सहाव्या वर्षीच कन्या प्रसूत होऊं लागतील.

देव गजाननास शरण जातील. तो अवतार घेऊन नील अश्वावर आरूढ होऊन म्लेंच्छरूप झालेल्या लोकांस मारील. मग कृतयुगास आरंभ होऊन सर्व विश्व धर्ममय होईल.

शेवटीं शिरस्त्याप्रमाणें फलश्रुति सांगून, हें सर्व कामप्रद, भुक्तिमुक्तिप्रद, पुण्य-वर्धन, नानालीलाधर गणेशाचें पुराण पुरें करण्यांत आलें आहे.

---

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम............ वि. ............
..........नोंद दि. ............

# प्रकरण तिसरें.

## गणेशपुराणांतील गोष्टी.

**वक्तुर्विवर्धते प्रीतिः सादरे श्रोतरि प्रभो ॥ ११ ॥** ( ख. २ अ. १ )

( **अर्थः**—[ ब्रह्मदेव म्हणतो ] हे व्यासा ! आदरयुक्त श्रोता मिळाला तर वक्त्याचें प्रेम विशेष वाढतें. )

सर्व पुराणांत जगाची उत्पत्ति, स्थिति व लय यांचे अनुक्रमें कारक जे ब्रह्मा विष्णु व महेश त्यांच्या, इंद्रादि स्वर्गवासी देवांच्या, भूस्वर्गपातालवासी अद्‌भुत शक्तींच्या मायावी दानवांच्या व यक्ष किन्नरादि अमानुष प्राण्यांच्या, तशाच अलौकिक ऋषींच्या गोष्टी अनेक आढळतात पण प्रत्यक्ष आम्हां दुर्बल मानवांच्या—जे आम्हीं भूतलावर सर्वत्र पसरलेले आहोंत त्यांच्या—अद्भुतरसविवर्जित स्वाभाविक अशा गोष्टी थोड्या आढळतात. त्यांवरून ज्या पुराणांत त्यांचा समावेश झालेला असतो तीं पुराणें ज्या काळांत लिहिलीं गेलीं त्या काळीं सामाजिक स्थिति कशी होती तिचा अंदाज करतां येतो. अशा गोष्टी या पुराणांत फारच थोड्या आहेत, त्यांतील कांहीं दिल्या आहेत.

### ( १ ) सोमकांत राजाची गोष्ट.

सौराष्ट्र देशांत सोमकान्त नांवाचा देवनगरचा महापराक्रमी बुद्धिमान्, संपत्तिमान व क्षमावान राजा होता. त्याला नीतिशास्त्रज्ञ अशा पांच मंत्र्यांचें साहाय्य होतें. त्याची सुधर्मा नांवाची गुणवती व रूपवती स्त्री होती. तिच्या पोटीं एक शुभलक्षणी पुत्र जन्मला. त्याचें नांव हेमकण्ठ असें होतें.

अशा सुखांत मग्न असतां पूर्वकर्मविपाकानें राजास गलत्कुष्ट झालें. भुजंगदंशा-प्रमाणें सर्वांगाला वेदना लागल्या. क्षतांत कृमी पडले. राजाला जीवित वृथा वाटूं लागलें. मंत्रिजनांस व राज्ञीस जवळ बोलावून तो म्हणालाः—" मी हेमकण्ठाला राज्यावर बसवून वनांत जातों. " मंत्रिजन बरोबर जावयास निघाले. त्यांस राणी ह्मणाली. राजाची सेवा करण्यास मी वनांत जातें. तुम्ही पुत्रासह राज्य करा.

हेमकण्ठ ह्मणाला " बाबा तुम्ही नाहीं म्हणजे मला राज्य नको." हें ऐकून राजा म्हणालाः—जो पित्याची आज्ञा ऐकितो तो पुत्र. तूं प्रजेचें पालन पितृवत् कर व रहा. मी पत्नीसह वनांत जातों.

नंतर राजानें मंत्रगृहांत पुत्रास आपल्या शेजारीं बसवून आचारनिरूपण केलें. जागोजाग आमंत्रणें करवून यथाशास्त्र पुत्रास राज्याभिषेक करविला. राजा म्हणाला, " अमात्य हो ! हा माझा पुत्र आहे ही तुमची बुद्धि कायम ठेवा. हा पुत्र तुमच्या हातांत दिला आहे. माझी आज्ञा तुम्हीं नीतिविशारदानीं जशी पाळलीत तशी याची श्रेणीमुख्यांनीं पाळावी "

सर्वांस पोशाख देऊन राजा वनांत गेला. लोकांत हाःहाःकार उडाला. हेमकण्ठ, नागरिक व अमात्य, हे राजा व त्याची पत्नी यांजबरोबर कांहीं अंतर गेल्यावर त्यांस राजानें निरोप दिला. तरी प्रधान ऐकेनात. पुढें प्रधान चालले, मध्यें राजा व राजाच्या मागून, रामाच्या मागून जशी सीता तशी त्याची धर्मपत्नी सुधर्मा चालली. एका वनांतून दुसऱ्या वनांत हिंडत जातांना श्रम पावून एकादेवेळीं छायेचा आश्रय घेऊन बसत. एकदां त्यांना ताल तमालवृक्षांनीं वेष्टित, कमळांनीं सुशोभित, हंस बकादि पक्ष्यांनीं अधिवासित असें रम्य सरोवर दिसलें. त्यांत सर्वांनीं स्नान करून फळें भक्षण केलीं. कांहीं अंतर आणखी गेल्यावर एका नदीच्या वालुकामय प्रदेशीं राजा शान्त होऊन क्षणभर निद्रित झाला व सुधर्मा त्याचे पाय चुरीत बसली.

इकडे राजाची अनुज्ञा घेऊन अमात्य कंदमुळें आणण्याकरतां गेले. तितक्यांत बसल्या जागेवर एक बालक सुधर्मेला दिसला. त्याची प्रसन्न मुद्रा पाहून हा आपला उपकारक आहे असें तिला वाटलें व तूं कोणाचा पुत्र आहेस ? तुझी माता कोण ? याचें उत्तर देऊन तूं आपल्या अमृततुल्य वाणीनें मला तृप्त कर असें ती त्या बालकास म्हणाली.

बालक म्हणाला " हे साध्वि ! माझा पिता भृगु, माता पुलोमा, माझें नांव च्यवन. मी पित्याच्या आज्ञेनें पाणी वाहाण्यास येथें आलों आहें. तूं कोण आहेस ? हा पुरुष कोण ? वर्षा ऋतूंत पर्वतावरून तसा याच्या अंगांतून स्राव कां होत आहे ? त्यास इतकी दुर्गंधि कोणत्या कर्मामुळें सुटली आहे ? तूं सर्वांवय व सुंदर असून या कृमियुक्त पुरुषाची सेवा कशी करीत आहेस ? लग्नापूर्वी तुझ्या पित्याला अथवा भ्रात्यांना व ब्राह्मणांस हें कसें कळलें नाहीं ? हे साध्वि ! तूं वनांत कां आली आहेस ? "

मुनिकुमाराची वाणी श्रवण करून हर्ष व शोक यांनीं युक्त होऊन राणीनें त्यास सर्व हकीकत सांगितली व ती म्हणाली " जो पण्डितांनी वेष्टित होत्साता आनंदसागरांत निमग्न असे तोच आज माझा पति कृमींनीं वेष्टित होऊन कष्टमय अवस्थेंत पडला आहे. या दुःखमय समुद्रांतून आम्हांस पार नेणारी तूंच आमची नौका हो. "

हें करुण वृत्त ऐकतांच पर दुःखानें दुःखी झालेला तो मुनिकुमार कलश भरून मुकाट्यानें घरीं गेला. पण विलंबकारण पित्यास निवेदन करतांना त्यानें सोमकान्त राजाचें वृत्त मुनींस कळविलें. मुनि करुणायुक्त म्हणाले " जा त्यांना त्वरित आश्रमांत घेऊन ये. " कुमारानें पित्याचा निरोप सुधर्मेस कळविला. तेव्हां शोकानें विह्वल झालेली सुधर्मा प्राण आले असतां जशी तनु सावध होते तशी सावध झाली व दोन अमात्यांस पुढें घालून पतीसह आश्रमांत जावयास निघाली. कांहीं वेळानें वैदिक घोषानें युक्त, पुष्पवृक्षलतांनीं व्याप्त, पक्षांच्या शब्दांनीं गजबजलेला असा त्यांनीं आश्रम पाहिला. त्यांत व्याघ्रचर्मावर सूर्याप्रमाणें तेजस्वी असा भृगु, राजाला दिसतांच हात जोडून राजा म्हणाला " हे द्विजवर्या ! माझी तपश्चर्या आज फळास आली. आपली दृष्टि माझें पाप नष्ट करील. " भृगूनें त्याचा सत्कार करून आश्वासन दिलें आणि त्याचें पूर्व-जन्मवृत्त सांगितलें.

## सोमकांत राजाचें पूर्वजन्मींचें वृत्त.

भृगु म्हणालाः—" विन्ध्याचला समीप कोल्हार नामक नगरांत चिद्रूप म्हणून विख्यात वैश्य होता. सुभगा नांवाची त्याची पतिव्रता स्त्री होती. त्यांचा तूं पुत्र झालास. तुझें नांव कामन्द असें ठेविलें. वार्धक्यकालीं झालेला म्हणून तुझे त्यांनीं फार लाड केले. वेळींच कौतुकानें तुझें लग्न करून दिलें. तुझ्या स्त्रीचें नांव कुटुम्बिनी ठेविलें. तिला सात मुलगे व पांच मुली झाल्या व तिचें नांव यथार्थ झालें. असा बहुतिथींचा काल लोटल्यावर पिता मृत्यु पावला व तुझी माता सती गेली. मग तूं स्नेहिवर्गांत सर्व धन उधळून टाकिलेंस. पत्नीनें सांगितलें तें ऐकलें नाहींस. घर विकावयाची पाळी आली. अपत्यांचें पोषण व्हावें म्हणून तुला वंशकंटकाला सोडून तुझ्या अनुज्ञेनें मुलें घेऊन माहेरीं गेली. मग तूं धनाचें हरण करणारा, स्त्रियांस भ्रष्ट करणारा, गांवचा चोर, जनांस अपकार करणारा, द्यूतांत वीर व बलहीन शूर असा निपजलास. पित्याची ठेव तुमचेकडे आहे असें असत्य बोलून पैसे उकळलेस. खोटी साक्ष देऊं लागलास. गृहगत सर्पाप्रमाणें लोक तुला भीऊं लागले. खिरींत पडलेल्या गोखरूच्या कांट्याप्रमाणें तूं असह्य झालास. राजाज्ञेनें तुला नगरांतून हांकून देण्यांत आलें. वनांत राहून तूं हत्या करूं लागलास. सिंहास पाहून हरिणें पळतात तसे लोक तुला पाहून पळत. पशुपक्षी मारून खाऊं लागलास. सिंहव्याघ्रादिकांस हांकलून वनांत दगड मातीचें मोठें घर बांधून त्यांत चोराच्या संगतींत राहून त्यांचा राजा बनलास. श्वशुरानें भीतीनें तुझी स्त्री व

मुलें तुझेकडे पोंचविलीं त्यांस घेऊन तूं गुहेंत राहत असस. चोरीवर आपल्या स्त्रीस देवांगनेप्रमाणें सजविलीस. मुलांस दागिन्यांनीं व वस्त्रांनीं मंडित केलेंस.

एकदां गुणवर्धन नांवाचा विद्वान ब्राह्मण तुला एकटाच भरदुपारीं वनांत भेटला. त्याचा तूं हात धरतांच तूं त्याला यमच वाटलास. तुझी करुणा भाकून ब्राह्मण म्हणाला ' अरे ! मला अनपराध्याला कां मारतोस ? माझी सर्व गुणांची खाणी पहिली स्त्री मृत्यु पावली. पितृ-ऋणांतून मुक्त होण्याकरतां, संतानवृद्धीकरतां प्रयत्नानें अधिक सुंदर गुणखाणी अशी दुसरी स्त्री केली. परस्परां वांचून परस्परांचें आमचें जीवित व्यर्थ आहे. तूं माझा पिता हो, माता हो, पुत्र हो ! जीवदात्याला शास्त्रांत पिता म्हटलें आहे. दस्यू सुद्धां शरणांगताचें रक्षण करतात. मी योग्य द्विज रक्षणास पात्र आहें. तसें न करशील तर नरकांत जाशील ! तुझे स्त्रीपुत्र, मित्र भोगाचे भागीदार आहेत. पापाचे होणार नाहींत. "

तुझें मन द्रवलें नाहीं. तूं म्हणालास " हे ब्राह्मणा ! तुझा उपदेश पालथ्या घागरीवर पाण्याप्रमाणें आहे. मद्यपास तत्त्वोपदेश रुचत नसतो. अर्थासक्तास पिता, बन्धु इत्यादिकांचा विचार नसतो. विधात्यानें माझेकडे—व्यापारशून्याकडे—तुला आयताच पाठविला आहे. मी तुला सोडणार नाहीं. " असें म्हणून तूं त्याची मान तोडिलीस.

अशीं तुझीं पापें मोजून विभागी कोणीं व्हावें ! पुढें तुला जरा प्राप्त झाली. कफ झाला, उचकी लागली, पुत्रादि अनादर करूं लागले. तुझा एक ब्राह्मण मित्र होता त्याचें स्मरण होतांच त्याच्याकडून कांहीं धर्म करावा म्हणून तूं ब्राह्मणांस आमंत्रण देववून आणविलेंस. ते म्हणाले तुझें पतिताचें आम्हीं दान घेणार नाहीं. असें म्हणून ते घरीं गेले आणि सचैल स्नान करिते झाले. शेवटीं तुला अतिशय पश्चात्ताप होऊन तूं एका जीर्ण गणेशाच्या देवालयाचा जीर्णोद्धार केलास व मृत झालास. दूतांनीं यमाकडे तुला नेल्यावर यमानें तुला विचारलें तूं अगोदर पापाचें फळ भोगतोस का पुण्याचें. तूं पुण्याचें म्हणतांच तूं या जन्मीं राजा झाला आहेस. "

नंतर भृगूनें त्याच्या कडून गणेश पुराण ऐकविलें. तेणें करून तो व्याधिमुक्त होऊन सपरिवार गणेश लोकाप्रत गेला. अशी कथा आहे. हींत एका भाग्यवान पण दुर्दैवी राजाचें चित्र सुरेख काढलें आहे. राजा व प्रजा, पिता व पुत्र, पति व पत्नी इत्यादिकांचें प्रेम जें वर्णिलेलें आहे तें आर्यसंस्कृतीस उचित आहे. असे आश्रम व तदधिष्ठित तपोनिष्ठ प्रभावशील मुनि आर्यावर्तांतच होऊन गेले.

## ( २ ) बुधाची गोष्ट.

गौड देशांत दुर्व नांवाचा धर्मशील ब्राह्मण रहात होता. त्याच्या पत्नीचें नांव शाकिनी असें होतें. त्यांना एक पुत्र झाला त्याचें नांव बुध ठेविलें होतें. सावित्री नांवाची याची स्त्री फार पतिव्रता होती. हा आपल्या पितरांचा एकुलता एकच पुत्र असल्यामुळें तीं त्यास सदैव अलंकृत ठेवीत. त्याचा क्षणभरही वियोग सोसण्यास तीं असमर्थ असत.

त्याला यौवन प्राप्त होतांच तो परनिंदा व परस्त्री यांत रत झाला. म्हणून त्यानें लवकरच स्वस्त्रीचा त्याग केला.

एकदां त्याच्या गावांत मन मोहित करणारी एक वेश्या आली. तिच्यावर त्याचें मन आसक्त झालें व त्यानें काय केलें पहा ! आपले दागिने सर्व वेश्येस दिले. स्वतांचें घर वर्जून तिच्या घरींच राहूं लागला. पुत्रदर्शना वांचून मी वांचणार नाहीं असें माता म्हणूं लागली. तिला रात्रौ पति म्हणाला " माझा पुत्र बुध कोठें गेला ? दीपाविणें जशी रात्रि, जलाविणें वापी, व अपत्याविणें स्त्री, तसें माझे गृह त्याच्या शिवाय मला शून्य भासूं लागलें आहे. "

पुत्राचा शोध करीत हिंडत असतांना त्याला एक वृद्ध अंत्यज भेटला व म्हणाला " तुझा पुत्र बुध कामासक्त होऊन वेश्येच्या येथें पडून आहे. हे धर्मशील ब्राह्मणा ! कोण कोणाचा पिता, माता, अथवा पुत्र आहे, तूं वृथा खेद करीत आहेस ! " पित्यानें जेव्हां पुत्रास वेश्येच्या घरीं जाऊन पाहिलें तेव्हां तो त्यास म्हणाला. " चंद्रामध्यें जसा कलंक तसा तूं माझ्या कुलांत अधम निर्माण झाला आहेस ! तुझ्याहून कांटेरी वृक्ष व शुष्क पाषाण चांगले. तूं प्राणत्याग कां करीत नाहींस? तूं जगून काय उपयोग ? " पित्याचें वाक्य श्रवण करतांच रोषाविष्ट होऊन पित्याच्या तोंडांत मारून बुध उलट म्हणाला " कृमिकीटकां सारखें मुख असणाऱ्या नराधमा ! माझ्या क्रीडाकालीं तूं विघ्न आणलेंस ! एकाएकीं ही कावळ्याची विष्ठा माझ्यावर कशीरे पडली ! "

नंतर बुधानें लत्ताप्रहारानें पित्याचा प्राण घेतला व पायांस बांधून शव दूर ओढून टाकिलें. घरीं गेला तो तेथें माता भेटली. ती त्यास म्हणाली. " पुत्रा ! तुझ्या करतां अन्न वर्ज्य केलें आहे. तुझा पिताही तुझा शोध करीत भ्रमण करीत आहे. त्याला भेट. " असें ती वारंवार म्हणाली. तेव्हां कोपयुक्त होऊन तिला डोक्यावर शुष्क यष्टि घेऊन बुधानें मारिलें. तिचा प्राण गेला तेव्हां तिच्या पायास दोरी बांधून तिला बुधानें दूर ओढून फेंकून दिलें. पुन्हां बुध वेश्येकडे जाऊन राहिला.

लोकांनीं पितरांचा दहनविधि केला. राजानेंही ब्राह्मण म्हणून शासन केलें नाहीं.

पुढें एकदां बुध घरीं आला. तेव्हां त्यास त्याची पतिव्रता स्त्री सावित्री हळुच म्हणाली. " हे महामते ! हे प्राणनाथ! एक गोष्ट सांगतें ती ऐका! अतिविख्यात निर्मल कुळांत आपला जन्म झाला आहे परंतु आपलें आचरण मात्र अगदीं भिन्न आहे तें जरा विवेक करून सोडून द्या. ज्यानें परलोकीं सुख होईल तें कार्य इहलोकीं करावें. वार्धक्यांत सुख देणारें कार्य पूर्ववयांत करावें व रात्रीं सुखप्रद होणारें कार्य दिवसास करावें. चतुर्मास पावसाळ्यांत सुख होईल असें कार्य इतर आठमासांत करावें. सर्वावय व संपूर्ण, सुंदर, मनाप्रमाणें वागणारी मी तुमची धर्मपत्नी जीवन्त असतां तिचा त्याग करून वेश्येच्या ठिकाणीं कसे रत झालांत ? लोक सगळे मागाहून तुमची निंदा करतात पण भयानें तोंडावर बोलत नाहींत. पण मला मात्र म्हणतात ' शुभे ! तुझा पति असा कसा हा ! ' मी लज्जेनें लागलीच खालीं मान घालतें. मला प्राणत्याग करण्याची इच्छा होते. तुम्हीं जर माझ्याशीं रात्रंदिवस यथेष्ट रममाण होऊन राहिलेत तर कोणी कांहीं बोलणार नाहीं. तुम्हांला दोष लागणार नाहीं. हिताची इच्छा असल्यास माझें म्हणणें ऐका व विवेक करून त्या वेश्येचा त्याग करा ! एकवार अज्ञानानें अथवा प्रमादानें केलेलें कार्य शहाण्यानें सोडावें. असें तुम्हीं केल्यास माझें हित होईल. नाहीं तर अनहित होईल तें साधणें अनुचित आहे. भलतेंच कार्य करणाऱ्यास इहलोक नाहीं व परलोक नाहीं." हें भाषण ऐकून बुधाच्या अंगाची आग होऊन तो म्हणाला " हे दुष्टे ! निर्लज्जे ! शहाण्ये ! मी रागावलों म्हणजे ज्या मार्गानें माझे आईबाप गेले त्या मार्गानें तूं जाशील."

सावित्री म्हणाली " ज्यानें स्वतंत्रपणें उपदेश करणाऱ्या आईबापांची मर्यादा ठेवली नाहीं तो त्यांहून निराळ्या अशा माझी कशी राखील ? साध्वीला पतीच्या हातून मरण येणें इह परलोकीं श्रेयस्कर आहे ! "

असें भाषण ऐकतांच बुधानें पितरांच्या मार्गानें तिला यमसदनास पाठविलें हें सांगावयास नकोच. प्राणनिर्गमनकालीं सावित्रीनें पतिरूप रामाचें स्मरण केलें व ती मुक्त झाली.

पुढें बुध मात्र अधिकाधिक पापें करीत असतां कालभीमुनीच्या स्त्रीच्या शापानें पुढील जन्मीं कुष्टी होऊन पूर्वजन्मार्जित पाप भोगीत बसला.

या गोष्टींतील प्रकार प्रत्यहीं घडत असतांना अद्यापिही आढळतात. पितरांचा खून

वेश्येपायीं पुत्राच्या हातून प्रत्यक्ष घडलेला आढळत नसला तरी कितीक आईबाप खेदानें मरत आले आहेत ! व कितीक साध्वी स्त्रिया सावित्रीप्रमाणें हाल सोसून स्पष्टतेंच बोलून राम म्हणत आहेत !

## (३) ज्योतिषी ढुंढिराज

दिवोदासाच्या राज्यांत पापप्रसार* करण्यास ढुंढिराज सुन्दर रूप धारण करून गेला. मनांत धरलेला प्रश्न तो नेमका सांगत असे, स्त्रिया, बालकें व पति यांस टाकून याच्याकडे प्रश्न विचारण्यास जाऊं लागल्या. आपल्याच मायेनें पाडलेलीं स्वप्नें तो लोकांना सांगतसे. सेवा करणाऱ्या लोकांस वरप्रदान करून कुष्टरोग नष्ट करीत असे. वरानें वंध्या स्त्रिया गर्भवती होत. तो हात पाहून महाभाग्यें व कर्में वर्तवीत असे. फार काय सांगावें कोणी काय खाल्लें आहे व काय खाणार आहे तें सांगतसे. लोक म्हणूं लागले असा सर्वज्ञ गुणांचा सागर आम्हीं पाहिला नव्हता. असा ब्राह्मण मागें झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. याचा प्रत्यय येतांच लोक धनानें व रत्नानें पूजा करूं लागले. हातांत धरलेली वस्तु तत्काल सांगतसे. दरिद्री उद्योग न करणारा प्रश्न विचारावयास आला असतां त्याचा अभिप्राय जाणून दोन तीन दिवसांतच द्रव्य मिळेल म्हणून सांगे व त्याप्रमाणें मिळत असे. नष्ट झालेली वस्तु इ. सर्व सांगे. अशी कीर्ति ऐकून काशी राजानें त्याची स्थापना वाड्यांत आणून केली. गांव व धन अर्पण करीत असतां ढुंढि म्हणाला "मला प्रपंचरहित निस्पृहाला कांहीं नको. मात्र आजपासून सत्राव्या दिवशीं जो श्रेष्ठ पुरुष येईल त्याचें ऐक म्हणजे मला तूं सर्व अर्पण केलेंस असें होईल." राजानें वचन दिलें व ढुंढि निघून गेला.

---

* दिवोदासाच्या राज्यांत पापाचा प्रसार करण्यास ढुंढीस कारण असें झालें कीं, अविमुक्त ( काशी ) क्षेत्रांत अनेक वर्षें अवर्षण पडलें. तेव्हां देवांनीं त्या क्षेत्रास बहिष्कार घातला. दिवोदास हा इक्ष्वाकु वंशांतील एक पुण्यवान राजा होता. त्याचें तप जाणून ब्रह्मदेवानें या काशीक्षेत्रांत त्यास राज्य दिलें. त्याच्या पुण्यप्रभावानें तेथें वृष्टि झाली. इकडे शंकरास काशीक्षेत्राचा विरह सहन होईना. परंतु काशींत दिवोदासाच्या राज्यांत कांहीं छिद्र असल्याशिवाय त्यास पदमुक्त करतां येत नाहीं. जेवढे छिद्र शोधावयास गेले ते तेथेंच राहिले. शेवटीं शंकराच्या सांगण्यावरून ढुंढीनें प्रयत्न केला व तो या गोष्टींत सांगितल्या प्रमाणें यशस्वी झाला व शंकर स्वक्षेत्रीं परत आला.

ढुंढीनें सांगितल्याप्रमाणें बुद्ध सत्राव्या दिवशीं आला व पृष्ठ ६ येथें वर्णन केल्याप्रमाणें त्यानें आपल्या मताचा प्रसार करून लोकांस धर्मभ्रष्ट व पापी केलें. मग एक दिवस दिवोदासाची भेट घेतली व तो म्हणाला " तुझें पुण्य आज पर्यंत होतें. तों तूं राज्य केलेंस. आतां तुझ्या राज्यांत पाप सुरू झालें आहे. राजा प्रजेच्या पापाचा विभागी असतो. म्हणून तूं राज्य सोडून जा नाहीं तर काळभैरव तुला घालवून देईल." राजानें ढुंढि ज्योतिष्यास वचन दिल्याप्रमाणें बुद्धाचें ऐकलें व शिक्का मोर्तब खालीं ठेवला.

दिवोदास स्वतां पुण्य कर्मी होता. त्यानें ध्यान लावून पहातां त्याला कळून आलें कीं ढुंढि हा गजानन आहे व बौद्ध विष्णु आहे म्हणूनत्यानें त्यास तूं कोण असें विचारतांच तो विष्णु स्वरूप झाला. राजानें त्याजवळून मुक्ति मागून घेतली.

ज्योतिष्याचा नाद जसा पूर्वी तसा अद्यापि ही चालूच आहे. व पुढें चालू राहील. अशीं बळकट चिन्हें दिसत आहेत.

---

## प्रकरण चवथें.

## श्रीगणेशस्वरूप.

**येन येन हि रूपेण जनो मां पर्युपासते ।**
**तथा तथा दर्शयामि तस्मै रूपं सुभक्तितः ॥**

( खं. २ अ. १४७ )

**अर्थ**—मनुष्य जें जें रूप मनांत आणून माझी उपासना करतो तें तें रूप त्याला मी त्याची भक्ति पाहून दाखवीत असतों.

जेव्हां जेव्हां भक्तांस साक्षात्कार झाला असें या पुराणांत म्हटलें आहे तेव्हां तेव्हां गणेशाच्या साकार स्वरूपाचें वर्णन केलेलें आढळतें तें फार ऐश्वर्यवान असतें. उदाहरणार्थ खण्ड १ अ. १२ पहा. पायांच्या नखश्रीनें लालकमळाच्या केसरांस जिंकणारें; लालवस्त्राच्या प्रभावानें संध्यासमयींच्या सूर्यमण्डळास हंसणारें; कटिसूत्राच्या प्रभापुंजानें सुवर्णमय मेरुपर्वताच्या शिखरास लघु गणणारें; खड्ग, खेट, धनुष्य व शक्ति

यांस धारण करणाऱ्या चारीभुजांनीं व कमनीय नासिकेनें शोभणारें; मुखांबुजाच्या कान्तीनें पुनवेच्या चंद्रास लाजविणारें; अहर्निश प्रभेनें झळकणारें; पद्मप्रमाणें ललित-लोचनांनीं तसेंच अनेक सूर्यांच्या तेजास निस्तेज करणाऱ्या मुकुटानें प्रकाशित अशा मस्तकानें युक्त असून उत्तरीय वस्त्रानें अनेक नक्षत्रांनीं चिन्हित झालेल्या आकाशाची दीप्ति हरविणारें; महावराहाच्या दंष्ट्रांच्या शोभेचा धिक्कार करणाऱ्या एकदन्तानें विराजित व ऐरावतादि दिक्पालांच्या शुण्डेस भिवविणाऱ्या उत्तम शुण्डेनें युक्त असें ब्रह्मा, विष्णु व महेश यांस साक्षात्कार झाला तेव्हां गणेशाचें रूप होतें.

आमचे भक्त साधे आहेत पण आमचा परमेश्वर भगवान म्हणजे ऐश्वर्यवान आहे. भक्त तुकाराम साधा पण त्याचें दैवत जें परब्रह्म विठ्ठल त्याच्या कानांत मकर-कुण्डलें तळपत असतात व कण्ठांत कौस्तुभमणि विराजत असतो.

हें मन आकृष्ट करणारें गजाननाचें बाह्य स्वरूप झालें, पण त्याच्या ठिकाणीं मन खिळवून टाकणारें गुणमय अन्तःस्वरूप वर्णन करतां यावयाचें नाहीं. असें या पुराणाच्या कर्त्यानें स्पष्ट कबूल केलें आहे. " काशीराजा विनायकाची स्तुति करतांना म्हणतो " पृथ्वीचे रजःकण कोणी एकादा मोजील, आकाशांतील तारकांची संख्या केवढी तेंही सांगेल, पर्जन्याची एकून एक धार गणून सांगेल; पण हे विनायका ! तुझ्या गुणांची गणना शेषाला किंवा प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला सुद्धां अनेक वर्षांनींही करतां यावयाची नाहीं. * तथापि या पुराणांत भक्तांच्या तोंडीं जी गणेशाची स्तुति घातलेली आहे, तींत परब्रह्मस्वरूपी गणेशाचे गुण फारच मार्मिकपणें व याथातथ्य रीतीनें वर्णिलेले आहेत. उदाहरणार्थ खण्ड १ अ १ पहाः " हा गणेश नित्य आहे, अनादि आहे, निर्गुण म्हणून अवर्ण्य आहे, सर्व कारणांचें कारण आहे. याच्या आज्ञेनें ब्रह्मदेव सृष्टि निर्माण करतो, विष्णु तिचें रक्षण करतो, व शंकर तिचा लय करतो. याच्या आज्ञेनें सूर्य आकाशमार्गानें संचरतो, वायु वहातो, पाण्याचे प्रवाह वाहतात, व अग्नि आपलें ज्वलनकार्य करतो. " ( श्लोक १४–१७ )

एकदां पार्वतीनें शंकराला ध्यानस्थ असतां पाहिलें तेव्हां तिनें शंकराला प्रश्न केला " तुम्ही सर्वांत मोठे असतां ध्यान कुणाचें करतां " ? त्याचें उत्तर देतांना शंकर

---

* धरारजः कोऽपि मिमीत नाके । तारागणं वारिमुचां च धाराः ॥
नालं गुणानां गणना हि कर्तुम् । शेषोविधाता तव वर्षपूगैः ॥ ३४ ॥
( खण्ड २ अ. ५३ )

म्हणाला. " जो सर्व विश्वाचा कर्ता असा देव सर्व भूतांच्या ठायीं गूढपणें वास करतो. ज्याला अनंत शीर्षे आहेत, अनन्त चरण आहेत, अनंत कान आहेत, अनंत नेत्र आहेत, ज्याचीं अनंत नामें आहेत, अनंतरूपें आहेत, जो स्वयं प्रकाशित होणारा आहे, जो विश्वाचा आत्मा आहे, पुराण पुरुष आहे, जो अनुपम आहे XXXX जशा मेघांपासून जलधारा अथवा अग्नीपासून स्फुलिंग उत्पन्न होतात तसे ज्यापासून अनंत जीव उत्पन्न होतात, जो सत्व रज व तम हे तीन गूण, ब्रह्मा विष्णु व मी यांस वाटून देऊन अनुक्रमें सृष्टीची उत्पत्ति स्थिति व लय हीं कार्यें करून घेतो, ज्याला या गुणविभागामुळें गुणेश म्हणतात त्या परमात्म्याची पर अशी जी प्रकृति तीहूनही पर अशा या विभू, परब्रह्मस्वरूपी गुणेशाचें ध्यान करतों." ( पहा खं. २ अ. ७९ श्लोक २७ ते ३३ ) हा वाणीचा व विचारांचा विषय नाहीं, ( खं. १ अ. ४० ); प्रमाणांचा विषय नाहीं, ( खं. १ अ. ४४ ); इच्छाशक्ति, क्रियाशक्ति व ज्ञानशक्ति यांनीं युक्त आहे, ( खं १ अ. ४६ ); येथें वेदही कुंठित होऊन नेति नेति असें म्हणून स्तब्ध झाला, ( खं. १ अ. ८८ ); हा तत्त्वमसि इत्यादि औपनिषदीय शब्दांनीं बोध्य आहे अशा वेदान्ताच्या भाषेंत जरी सर्वत्र गजाननाचें वर्णन येतें तरी हा अणूहून अणु व महत् पदार्थाहून महान् आहे ( खं. अ. १८ ); पिता, माता, बन्धु, ( खं. १ अ. २२ ); सर्वांचा आधार, मायावी, ( खं. १ अ. ३४ ); कर्तुमकर्तु मन्यथा कर्तुम् समर्थ ( खं. १ अ. ४४ ); सुमंगलाचें सुमंगल, कल्पद्रुमवन, साक्षी, कर्माकर्मांचें फल देणारा, ( स्कं. १ अ. ४६ ); क्षिप्रप्रसादन, उदार, शरणागतदुःखनिवारक, संसारवैद्य, ( खं. १ अ. ४६ ), सच्चिदानंद, विद्यानिधि, अनाथनाथ, भक्तवत्सल, दयासिन्धु इत्यादि इत्यादि, सर्वांस समजेल अशा सोप्या भाषेंत ओघा ओघानें केलेलें वर्णन आढळतें, पण परब्रह्मरूपी गणेशाच्या स्वरूपाची सर्वांत उच्च कल्पना गणेशगीतेंत जेव्हां वरेण्याला गणेशानें विश्वरूप दाखविलें तेव्हांची होय. त्यांत सर्व ब्रह्माण्डांत गणेश भरलेला आहे असें दाखविलें आहे.

एवंच जो ज्ञानी असेल त्यानें ज्ञानचक्षूनें गजाननाचें सूक्ष्मरूप पहावें, त्याच्याकृपेनें जर दिव्यचक्षु मिळेल तर विश्वरूप पहावें पण आमच्या सारख्या प्राकृत अज्ञानी मनुष्यांनीं भक्तिभावें करून गजाननाला त्याच्या स्थूल साकाररूपाची अर्चा करून आळवावें, तो अनाथनाथ आहे, भक्तवत्सल आहे, क्षिप्रप्रसादन म्हणजे त्वरित प्रसन्न होणारा आहे. तो प्रसन्न झाला म्हणजे तो भक्त काम पुरविणारा कल्पवृक्ष सर्व कामना पुरवून अंतीं मोक्ष देईल कारण तो संसारवैद्य आहे. तो भवरोगावर औषध देत असतो.

# प्रकरण पांचवें.

## गणेशपुराणांतील तत्त्वज्ञान.

**यस्य यद्विहितं कर्म तत्कर्तव्यं मदर्पणम् ।**
**ततोऽस्य कर्मबीजानामुच्छिन्नास्युर्महाङ्कुराः ॥ ३६ ॥**

(खं. २ अ. १३८)

**अर्थः**—जें ज्याचें शास्त्रविहित कर्म असेल तें मला अर्पण करावें म्हणजे त्याच्या कर्मबीजाचे मोठे अंकुर छिन्न होतील.

पुराणें हीं मुख्यतः धर्मशास्त्र व नीतिशास्त्र यांतील तत्वांचें विवेचन करणारे ग्रंथ आहेत. त्यांत संगतवार एक एका तत्त्वावर निबंध रचलेले नाहींत पण कांहीं तत्त्वांचें सत्य गोष्टी रूपानें पटवून दिलेलें आहे. कांहीं तत्त्वें कोणाच्या मुखांतून प्रसंगोपात्त वदविलेलीं आहेत. तीं फार सुंदर आहेत व व्यवहारोपयोगी म्हणून संग्राह्य आहेत यांत संशय नाहीं. अशीं कांहीं तत्त्वें गणेशपुराणांत आढळलीं तीं पुढें दिलीं आहेत.

### पाप्याचा कबूल जबाब.

शंभर यज्ञ करण्याच्या पुण्याईमुळें इंद्राला स्वर्गीं कृत्रिमपद प्राप्त झालें खरें परंतु त्यानें मौर्ख्याचरणानें आपल्या मार्गांत विघ्नें उत्पन्न केलीं. गौतमाचें रूप धारण करून त्याच्या स्त्रीचें पातिव्रत्य हरण केलें. गौतमाच्या शापानें त्याच्या शरीरास सहस्र भग उत्पन्न झाले व गौतमी शिला झाली. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. गौतमीनें इंद्राचें कपट त्याच्या अंगाचा दिव्य वास येतांच ओळखिलें. तिनें त्याचा धिक्कार करून गौतम घरीं येतांच सर्व वृत्त सांगून अपराधाची क्षमा मागितली व ती म्हणाली.

**स्वयं निवेदनेऽदोषो, दोषोऽपरनिवेदने** ( खं. १ अ. ३१ )

**अर्थः**—आपण होऊन आपला अपराध कबूल करण्यांत दोष नाहीं. परंतु तो दुसऱ्याकडून प्रकट झाल्यानें अपराधी दोषी होतो.

दुसऱ्यानें जाऊन सांगितल्याच्या आधीं आपण होऊन ज्याचा अपराध आपण केला असेल त्याच्याशीं तो कबूल करणें म्हणजेच अनुतापानें अपराधाची निष्कृति करणें होय. मनाच्या शुद्धीनें अपराधांतील दोष नाहींसा करणें होय. पुन्हां तो अपराध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकार क्रमांक ... नोंद दिनांक ...

न होऊं देण्याची खबरदारी घेणें होय. असें करणें सज्जनाशिवाय साधत नाहीं. अशा वर्तनानें ज्याचा अपराध केलेला असतो त्याला क्षमाशस्त्र खड्गाहून किति थोर आहे तें उपयोगानें कळतें. दुसऱ्याकडून प्रकट होईपर्यंत विलंब करणें म्हणजे अनुतापाला मनांत शिरण्याचा मज्जाव करून त्याला निगरगट्ट बनवून पुन्हां पुन्हां ते तेच किंवा त्यांहून अधिकाधिक मोठे अपराध करण्याची संवय लावून घेणें होय.

याच कारणास्तव देवांनीं गौतमाच्या शापानें कुत्सितदेह झालेल्या इंद्राला हांक मारून सांगितलें कीं तूं लपून बसूं नको. बाहेर ये व नारदमुनींजवळ आपला अपराध कबूल करून मुनि उपाय सांगेल तो कर. कारण

**दोषे जाते स्वयं सन्तः ख्यापयन्ति जनेषु तम् ॥**
**तत्र प्रतिविधिं सम्यक् कुर्वन्ति तं निरर्थकम् ॥ ३ ॥**
**अच्छादने दोषवृद्धिः ख्यापने तु लयो भवेत् ॥**

( **अर्थः**—कांहीं अपराध घडला असतां सज्जन जे आहेत ते आपण होऊन लोकांत त्याची ख्याति करतात व त्याचा प्रतिकार उत्तम प्रकारें करून घेतात कारण निरर्थकपणें लपवाछपवी करण्यानें दोषाची वृद्धि होते. उघडपणें लोकांस सांगितल्यास दोषाचा लय होतो. ( खं. १ अ. ३३ )

इंद्रानें त्याप्रमाणें शब्दशः वर्तन केलें व त्याचा देह दिव्य झाला हें प्रसिद्ध आहे.

## कर्मविपाक.

या पुराणांत दुसरें एक मोठें नीतितत्त्व सांगितलें आहे तें असें कीं मनुष्य जें शुभ किंवा अशुभ कर्म करतो तें त्याला सुटत नाहीं. त्याचें फल त्याला भोगावें लागतेंच * प्राण्याच्या पूर्व कर्मांचें फल म्हणून दुःख किंवा सुख भोगणें प्राप्त होतें. तें दुसरा कोणी भोगीत नाहीं † हें तत्त्व सर्व हिंदूस मान्य झालें आहे कारण त्यांचा असा पक्का समज आहे कीं परमेश्वर न्यायी आहे. तो कर्माकर्मांचें फल देत असतो. उगाच कोणाला शिक्षा करीत नाहीं अथवा सुखाचे राशीवर बसवीत नाहीं. हें तत्त्व सोमकान्ताची गोष्ट पृष्ठ २२ येथें आहे ती त्याच्या पूर्व जन्मींच्या वृत्तासह वाचली म्हणजे समजेल.

हिंदुधर्मीय लोकांत जे पुष्कळ पापभीरु लोक आढळतात त्याचें वर्म ह्या समजांतच आहे.

---

* शुभंवाऽप्यशुभं कर्म न मुंचति नरं क्वचित् ॥ २ ॥ ( खं १ अ. २ )

† दुःखस्य भोक्ता न परोऽस्ति नैव सुखस्यवा पूर्वकृतस्यजन्तोः ॥२२॥ ( खं १. अ २ )

## चुकून झालें तरी पुण्यच

भगवद्भक्त वामन पण्डित म्हणतात चुकून तोंडांतून निघालेलें परमेश्वराचें नाम सकल पातक भस्म करण्यास समर्थ आहे. अग्नीवर पाय जरी चुकून पडला तरी तो भाजावयाचा रहात नाहीं. अग्नीचा स्वाभाविक धर्म—जो स्पृष्ट वस्तूला भाजण्याचा आहे तो—अग्नि कधीं सोडणार नाहीं मग मनुष्य त्याला मुद्दाम स्पर्श करो अथवा चुकून स्पर्श करो. हा अग्नीचा—एका सृष्ट पदार्थाचा—धर्म, परमेश्वराच्या अंगांत आहे; हें तत्त्व या पुराणांत सोदाहरण सांगितलें आहे तें असें:—

एक चाण्डाळीण, मद्यप्राशनानें मत्त होऊन दिवसा निद्रित झाली व रात्रीच्या पहिल्या प्रहरीं क्षुधित होऊन जागी झाली. ती रात्र संकष्टी चतुर्थीची असल्यामुळें व्रत करणाऱ्याच्या घरीं भिक्षा मागावयास गेली. मिळालेलें अन्न तिनें सहज गणेशनामाचा उच्चार करून चंद्रोदयीं भक्षण केलें. तेणें करून तिला सहजीं चतुर्थीच्या व्रताचें पुण्य घडलें व गणपतीनें तिला विमान पाठविलें ( खं. १ अ. ७४ )

## ईश्वरपरीक्षा.

ईश्वर नानारूपानें अवतरत असतो. त्याची परीक्षा पाहूं नये. तसें करणाऱ्याच्या गर्वाचें खण्डण होतें. असा सर्व पुराणांचा अभिप्राय आहे. त्याविषयीं या पुराणांत पुढील गोष्ट दिली आहे.

दैत्यत्रासापासून पृथ्वीला सोडविण्याकरतां, परमेश्वर कश्यपाचा पुत्र होऊन अवतरला. त्याला लग्नप्रसंगानें काशीराजानें आपल्या घरीं नेलें. तेथें त्यानें बालक्रीडा करीत असतां, इंद्र व विष्णु यांसही अजेय अशा राक्षसांचा वध केला. तें पाहून हा देव असावा कारण ह्या अद्भूत पराक्रम करतो, अथवा हा मानव असावा कारण मुलाप्रमाणें क्रीडा करतो, असा तर्क करून कांहीं नागरिक राजाकडे गेले व विनायकाची कांहीं सेवा आम्हांस करणें आहे असें म्हणाले.

राजा म्हणाला:—या देवरूपी किंवा मनुष्यरूपी बालकावर तुमची भक्ति असेल तशी पूजा करा. जन हो ! सत्व, रज व तम या तीन गुणांच्या योगानें मनुष्यें तीन प्रकारचीं असतात. दुष्ट असतात ते अशावेळीं परीक्षा करूं पहातात, पुण्यवान भक्ति करतात व दुसरे नुसती निंदा अथवा स्तुति करतात. आपआपल्या स्वभावाप्रमाणें पुरुष वागतो. चंदन घांसलें तरी आपला चारुगंध सोडीत नाहीं. कस्तुरी चिखलांत सांडली तरी आपला गुण टाकीत नाहीं. तसाच कंदर्प आपला वास लपवीत नाहीं. तुमची या मुनिपुत्रावर अनन्य भक्ति असेल तर त्याची पूजा करा.

त्यांचा अभिप्राय जाणून विनायक तेथें घरांतून आला व म्हणाला:—"आपल्या सारखे ज्ञानी माझी पूजा उगीच करीत आहेत, ते वांझ गाईचें दूध काढीत आहेत, कल्पवृक्षास सोडून इतर वृक्षाची याचना करीत आहेत." परंतु त्यांच्या आग्रहास्तव विनायकानें त्यांच्या घरीं जावयाचें कबूल केलें.

कित्येकांनीं माण्डव उभारून त्यांस आरशानें सुशोभित केलें. सुगन्धि पुष्पें द्रव्यें, फलें, व पक्वान्नें सज्ज ठेवलीं.

नगरांत अन्य ठिकाणीं शुक्र नांवाचा दरिद्री ज्ञाननिष्ठ ब्राह्मण विद्रुमानामक पतिव्रता पत्नीसह आपल्या चंद्रमौळी पर्णकुटिकेंत नांदत असे. तो नित्याप्रमाणें भिक्षेस गेल्यावर पहातो तों जो तो समारंभांत मग्न दिसला व त्याचें जाई तिथें निवारण होई. कारण समजतांच घरीं येऊन स्त्रीस म्हणाला " विनायक आमचे घरीं येण्याचा संभव आहे. म्हणून तयारी कर. भक्तीनें दिलेलें पत्र ईश्वराला दंभानें दिलेल्या सुवर्णाहून थोर आहे. " त्याच्या स्त्रीनें अठरा धान्यांची भाकरी भाजून पेजगुडा भात केला व मुखशुद्धीकरतां आंवळकटी ठेवली आणि दोघें वाट पहात बसलीं.

इकडे मुनिपुत्राचें कौतुक पाहण्यास सनक आणि सनंदन राजाकडे आले व म्हणाले आम्हांला मुनिपुत्राचें दर्शन करून दे. तोंच हातांत मोदक घेऊन बालक पुढें आला. तेव्हां आपापसांत सनकसनंदन कुजबुजले. " हा मुनिपुत्र क्षत्रियाकडे कसा राहिला ? याला स्पर्शास्पर्श समजत नाहीं. आम्हां स्वधर्मनिष्ठांना असल्याच्या दर्शनापासून काय फायदा ? "

हें जाणून मुनिपुत्र म्हणाला "तुमचें ज्ञान म्हणजे व्यर्थ श्रम आहेत. प्राकृतांप्रमाणें स्वर्ग सोडून उगाच येथें आलांत."

नंतर राजाची अनुज्ञा घेऊन सनकसनंदन परत जातांना मणिकर्णिकेवर स्नानास गेले.

तों तिकडे विनायक शुक्राची भक्ति पाहून बालकासह त्याकडे गेला. परमेश्वर राजवाडे टाकून पर्णकुटिकेंत आला हें पाहून त्या दंपत्यांच्या अंगावर रोमांच दाटून नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले.

विनायकानें विनीत उपचाराची पूजा स्वीकारून भाकरी खाल्ली व भात भुरकला. गुडघाभर पाणी घालून यानें भात शिजवला असें म्हणून मुलें हंसूं लागलीं. पहाणारे साश्चर्य झाले. विनायकानें शुक्रास संपत्ति दिली व मोक्ष दिला.

विनायकाचा शोध करतां करतां नागरिकांस तो शुक्राच्या घरीं सांपडला. त्यासरसे दांभिक व भावशून्य घरीं गेले व पक्वान्नावर हात मारूं लागले.

मग भाविक तिष्ठत बसले आहेत असें पाहून विनायक जरी एकटा होता तरी घटाकाशाप्रमाणें अनेक रूपें घेऊन सर्वांच्या घरीं एकाच वेळीं दृश्यमान झाला. उदकानें भरलेल्या कुंभामध्यें सूर्य जसा नानारूप दिसतो तसा कोठें पर्यंकावर निद्रित, कोठें जपपरायण तर कोठें भोजनोत्सुक असा एकाच वेळीं दिसूं लागला.

अशा वेळेस सनक सनंदन स्नान करून भोजनार्थ हिंडले. पण जातील तेथें स्पर्शास्पर्श न जाणणारा विनायक निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेला आढळला. सर्व दिशांना विनायक स्वरूप प्राप्त झालें म्हणून ते शंकर व विष्णु यांचें ध्यान करूं लागले. तों नेत्र मिटतांच विनायकच दिसूं लागला. नेत्र उघडतांच पूर्ववत् तोच दिसूं लागला. शेवटीं भेदाचा त्याग करून ते विनायकास शरण गेले व त्याची स्तुति करूं लागले. ( खं. २ अ. २५ )

तात्पर्य परीक्षा पाहणें हे भक्तांचें काम नव्हे. भक्त मुक्त होतात. परीक्षा पाहणारे फजीत पावतात. अशांच्या या गोष्टी पुराणांतरीं आढळणाऱ्या हल्लींच्या काळीं सुद्धां दिसून येतात. तुकारामबुवांची परीक्षा मंबाजीबुवा पाहूं लागले. त्यांचा छळ करूं लागले; पण शेवटीं फजीत पावून त्यांसच शरण गेले ही कथा प्रसिद्धच आहे.

## दैवतांविषयीं अभेददृष्टि.

आपण नेहमीं असें पाहतों कीं कोणी शिवाचे भक्त तर कोणी विष्णूचे व कोणी रामाचे. परंतु हे तीन ही एकाच देवाचीं रूपें आहेत व भक्ताच्या रुचीप्रमाणें एकच देव तीं धारण करतो. याविषयीं एक कथा गणेश पुराणांत आढळते.

विश्वदेव म्हणून एक ब्राह्मण पार्वतीकडे आला. तिनें त्याचा सत्कार करून भोजनाची सिद्धता केली व पात्रें वाढलीं. ब्राह्मण अपोशान घेऊन चिंता करूं लागला. कारण विचारतां म्हणाला " क्षीरार्णववासि विष्णूचें दर्शन घेतल्याशिवाय मी अन्नाचें सेवन करीत नसतों. "

गुणेश म्हणालाः—जी ब्रह्मदेवासही अगम्य ती शिवा तूं प्रत्यक्ष पाहिलीस. ही सर्व लोकांची जननी आहे. देवांची परम अद्‌भुत शक्ति आहे. हिच्या दर्शनानें तुला विष्णूचें दर्शन झालेंच असें समज. विश्वदेव म्हणालाः—मी रमापतीचा दास दुसऱ्या कोणाला नमस्कार करीत नसतों. तुझ्या अंगीं सामर्थ्य असेल तर विष्णु दाखव.

असा दृढ भाव पाहून गुणेश गुप्त झाला व विष्णुरूपानें प्रकट झाला. पुढें गणेश-चतुर्थीचा उत्सव गांवांत चालला होता तेथें विश्वदेवास गुणेशानें नेलें. क्वचित् त्यास विष्णु दिसूं लागे. त्यास नमस्कार करतांच परत मयूरेश दिसूं लागे. याप्रमाणें पुन्हां विष्णु पुन्हां मयूरेश पाहून विश्वदेवानें आपली भेददृष्टि सोडून व भ्रांति टाकून मयूरेशाची स्तुति केली व अनुज्ञा घेऊन आश्रमीं गेला. ( खं. २अ. १०५ )

## मोक्षोपदेश

या पुराणांतील सर्वांत मोठें तत्त्वज्ञान म्हणजे गजाननानें वरेण्याला गणेश गीतेंत केलेला मोक्षोपदेश होय. वरेण्यानें गजाननास विनविलें " माझीं काम क्रोध व मृत्यु-भीति हीं ज्याच्यायोगानें नष्ट होतील व मला मुक्ति प्राप्त होईल तो योग मला सांग.

गजानन म्हणाला " माझ्या अनुग्रहानें तुझी बुद्धि स्थिर झाली असल्यामुळें योगामृतमयी गीता तुला सांगतों.

एकाद्या पदार्थाशीं योग होणें हा योग नव्हे; संपत्तीचा योग हा योग नव्हे; विषयांशीं योग हा योग नव्हे; माता, पिता, बन्धु, पुत्र व अदभुतरूपाची स्त्री यांचा योग हा योग नव्हे. अणिमादि ऐश्वर्यांशीं योग हा योग नव्हे; राज्ययोग, इंद्रपदाचा योग हे योग नव्हत. सूर्यत्व व अमरत्व यांच्या प्राप्तीचा योग हा योग नव्हे. शिवपद, विष्णुपद सत्यलोक, चन्द्रलोक यांची प्राप्ति हा योग नव्हे. योग नानाविध आहेत. त्यांचें अनुष्ठान ज्ञानी पुरुष करतात.

## ज्ञानी पुरुष.

ज्ञानी पुरुष वितृष्ण असतात. यदृच्छेनें मिळेल त्याच्यावर निर्वाह करतात. जीवन्मुक्त होऊन चित्तांत परब्रह्माचें ध्यान करतात. सर्व भूतांस आत्मतुल्य मानतात. कामक्रोध व इंद्रियांचा जय करतात. हृदयीं करुणा असल्यामुळें लोकांस अनुग्रह पूर्वक पावन करण्याकरतां सर्वत्र फिरून बोध करतात. असे समलोष्टाश्मकांचन, महा भाग्यवान पुरुष ज्याच्या अनुष्ठानामुळें दृष्टिगोचर होतात तो उत्तम योग तुला सांगतों. त्याच्या श्रवणानें जन्तु पापमुक्त होऊन भवसागर तरून जातो.

## अभेद बुद्धियोग.

उत्तम योग म्हटला म्हणजे शंकर, विष्णु, शक्ति, सूर्य व मी गणेश यांच्या ठिकाणीं अभेदबुद्धि ठेवणें. कारण मीच शिव आहें. विष्णु आहें व शक्ति आहें. मी जो जगत्कारण आहें त्याला अज्ञानामुळें लोक जाणत नाहींत. मी सर्वांचा साक्षी, जगच्चक्षु

कर्मांनीं अलिप्त, अविक्रिय, अप्रमेय, अव्यक्त, विश्वव्यापी व अव्यय आहें. मीच आनंदरूप परब्रह्म आहें. माझी माया श्रेष्ठ नरांसही मोहित करते. अनेक जन्मांनीं प्राणी मायेचें पटल सारून, विषयविरक्त होऊन उत्तम बोधाच्या योगानें जें ब्रह्म शस्त्रसंघातानें छेदतां येत नाहीं, अग्नीनें जाळतां येत नाहीं, पाण्यानें भिजवितां येत नाहीं किंवा वाऱ्यानें सुकवितां येत नाहीं अथवा जें ह्या वध्य शरीरांत असून ह्या शरीराचा वध झाला असतां ज्याचा वध होत नाहीं, तें जाणतो. परंतु जे ऋक्, यजुः व साम या वेदत्रयीच्या कर्मकाण्डमय वादामध्यें रत होत्साते कर्मांचें फल स्वर्गादिकांहून दुसरें आहे असें मानीत नाहींत व कर्मांचें फल स्वर्गप्राप्ति अशी कर्माची स्तुति करणाऱ्या व पुष्पित-वृक्षाप्रमाणें प्रमाणें रम्य भासणाऱ्या वेदवाणीची जे मूढ प्रशंसा करतात ते सतत जन्म, मृत्युरूप फल देणारें कर्मच करीत रहातात. स्वर्गांतील ऐश्वर्यांत रत होतात. ज्यांचा विवेक नष्ट होतो व भोगांत ज्यांची बुद्धि आसक्त रहाते ते आपलें आपणासच बंधन प्राप्त करून घेतात व कर्मपरायण होत्साते संसारचक्रांत भ्रमण करीत रहातात.

## ( २ ) कर्मयोग.

कर्मयोग हा कर्मबंधन तोडण्याचा उपाय आहे. जें ज्याचें शास्त्रविहित कर्म असेल तें त्यानें मला अर्पण करावें; म्हणजे कर्म बीजाचे अंकुरच उच्छिन्न होतील अशा कर्माच्या योगानें चित्तशुद्धि होते. चित्तशुद्धीच्या योगानें ब्रह्मसाक्षात्कार देणारी अभेद बुद्धि प्राप्त होते. तीसच योग म्हटलें आहे व तो मोक्षप्रद आहे. म्हणून बुद्धिमान पुरुषानें कर्मे करावींत. ज्ञानाच्या घमेंडीनें कर्मांचा अथवा धर्मांचा त्याग करूं नये. प्रथम मनुष्याचा अधिकार कर्म करण्याचा असतो व ज्ञानाविषयींचा त्याचा अधिकार कर्मानें चित्तशुद्धि झाल्यावर त्यास प्राप्त होतो.

## ( ३ ) साम्यबुद्धि–योग.

हा पशु; हा पुत्र; तसाच हा, मित्र; हा शत्रु; हा बन्धु; अशी जी बहिर्दृष्ट्या विषमता दिसते, ती टाकून त्यांच्या विषयीं हृदयांत समबुद्धि ठेवणें, त्याचप्रमाणें सुख व दुःख, क्रोध व हर्ष, यांविषयीं समबुद्धि ठेवणें; रोग व भोग, जय व अपजय, संपत्तीचा योग व वियोग आणि लाभ व हानि यांकडे समदृष्टीनें पहाणें, आणि सर्व वस्तूंच्या ठायीं, शिव, विष्णु, शक्ति, पंच तत्त्वें, देव, यक्ष, नाग, मनुष्य, गन्धर्व, पशु, पक्षी इत्यादींच्या आंतून व बाहेरून मीं गणेश भरलेला आहें अशी बुद्धि ठेवणें याला साम्यबुद्धि योग म्हणतात. ही साम्यबुद्धि कशी साधेल ? जशीं कूर्म

आपलीं अंगें संकुचित करून घेतो, तशीं विषयांपासून इंद्रियें आवरून धरावीं. म्हणजे आत्मानात्मबुद्धि प्राप्त होते. असा स्वधर्मासक्त पुरुष धर्म व अधर्म यांचीं फळें सोडून, जन्म व बंध यांतून मोकळा होतो. म्हणून हा समबुद्धियोग प्राप्त करून घ्यावा. धर्माधर्मांचीं फळें न मिळवितां कर्मे करण्याचें जें कौशल्य त्यालाच कर्मयोग म्हणतात. जेव्हां स्वर्गफलादि वेदवाक्यांविषयीं त्यास विरक्ति प्राप्त होऊन तो आत्मसंतुष्ट होतो, स्थाणुसारखी स्थिति प्राप्त होऊन परमेशाच्या ठायीं त्याची बुद्धि निश्चळ राहते तेव्हां त्या पुरुषाला स्थिरबुद्धि म्हणतात व त्याच सुखदुःखादि द्वंद्वापासून मुक्त झालेल्या पुरुषास स्थिरबुद्धि म्हणतात.

## इंद्रियनिग्रहाचें महत्व.

इंद्रियनिग्रह केला नाहीं तर विषयप्रेम मनांत राहून ज्ञानी पुरुषांचें मन परमेश्वराच्या ठायीं स्थिर होणार नाहीं. इंद्रियें फार वलवान आहेत. तीं पुरुषाचें मन परमेश्वरापासून दूर हरण करून नेतात. विषयांचें चिंतन करणाऱ्यांचें मन विषयांच्या ठायीं आसक्त होतें व विषयप्राप्तीची इच्छा उत्पन्न होते. ती तृप्त न झाल्यास क्रोध येतो. क्रोधापासून अज्ञान उद्भवतें. अज्ञानाच्या योगानें स्मृतिभ्रंश व बुद्धिभ्रंश होतात आणि शेवटीं तो पुरुष नष्ट होतो.

इंद्रियनिग्रह केलेल्या पुरुषास कृतबुद्धि म्हणतात त्याची विषयप्रीति नाहींशी होऊन त्याला ब्रह्मज्ञान होतें,

## सुख कसें मिळतें.

राग द्वेष सोडून व इंद्रियें स्वाधीन ठेवून जो विषयोपभोग घेतो त्याचें मन प्रसन्न होतें. त्याला आत्मविषयक बुद्धि सुचते व आत्मचिंतनानें अंतःकरणास शांति मिळते. आणि शान्ति मिळाली कीं सुखाची प्राप्ति होते, असा क्रम आहे.

## तात्पर्य.

इंद्रियें वश केल्याशिवाय आत्मचिंतन होत नाहीं. जी सर्व प्राण्यांची रात्रि—म्हणजे आत्म्याविषयीं अज्ञान—तींत योगी कधीं निद्रित होत नाहीं; पण जेव्हां व्यवहाररूपी दिवसास सर्व प्राणी जागत असतात तेव्हांच योगी निद्रित असतो. यास्तव इंद्रिय नियमन करून बुद्धि स्थिर करावी. सर्व कामनांचा त्याग करून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावें व मुक्त व्हावें.

## ज्ञानयोग उर्फ सांख्ययोग विरुद्ध कर्मयोग.

वेरेण्य म्हणालाः—हे प्रभो ! ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा अशा दोन निष्ठा मला तुम्हीं सांगितल्यात पण त्यांतील अधिक श्रेयस्कर कोणती तें मला निश्चयपूर्वक सांगा. गणपति म्हणतोः—कर्माला आरंभच केला नाहीं म्हणजे पुरुष निष्क्रिय राहील असें नाहीं किंवा कर्मांचा त्याग केला म्हणजे सिद्धि प्राप्त होते असें नाहीं. कोणताही पुरुष प्रकृतीच्या गुणांमुळें कर्म केल्याशिवाय एक क्षणभर सुद्धां रहात नाहीं. इकडे इंद्रियदमन करून तिकडे मनानें विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषास ढोंगी म्हणतात. इंद्रियदमन करून जो निरीच्छ कर्म करतो तो पुरुष श्रेष्ठ होय. म्हणून कर्म न करण्यापेक्षां निष्काम कर्म केलेलें श्रेष्ठ आहे. सकाम कर्म केल्यानें प्राणी बद्ध होतो. तसें न व्हावें म्हणून आशारहित व कर्मासक्तिरहित कर्में करावीं व तीं मला अर्पण करावीं. कारण मींच यज्ञांसह वर्णांची उत्पत्ति केली व म्हणालों—जशी कल्पवृक्षापासून तशी यज्ञापासून आपली वृद्धि करून घ्या. यज्ञ करून तुम्हीं देवांस संतुष्ट करा व देव तुम्हांस संतुष्ट ठेवतील. पंच महायज्ञ करून अवशिष्ट राहिलेलें अन्न जे खातात ते पापांपासून मुक्त होतात; पण जे देवांना अर्पण केल्याशिवाय फक्त आपणच अन्न शिजवून खातात ते महापापी होत. अन्नापासून भूतें होतात. पर्जन्यापासून अन्न होतें. यज्ञापासून पर्जन्य होतो व कर्मापासून यज्ञ होतो. वेदांपासून कर्म होतें व वेद माझ्यापासून झाले आहेत. यास्तव सर्व यज्ञांत मीच स्थित झालों आहें. हें यज्ञाचें ( कर्मांचें अथवा संसृतीचें ) रहाट गाडगें मी सुरू केलेलें पुढें चालवावें. पुरुषांनीं सर्व कर्में मदर्पण करावींत म्हणजे कार्य, अकार्य किंवा त्यांचें शुभ अशुभ फळ त्यांस प्राप्त होत नाहीं. असा निष्काम कर्मांचा महिमा आहे.

## कर्में निष्काम करावयाचीं मग तीं तरी कां करावयाचीं ?

निष्काम कर्में करणें तीं लोकसंग्रहाकरतां करावयाचीं. श्रेष्ठ पुरुष जें कर्म करतो तें सर्व लोक करतात. मला प्राप्तव्य असें कांहीं नाहीं पण मीही कर्म करीत असतों. मी स्वतंत्र म्हणून आळसानें जर कर्म न केलें तर लोक कर्म सोडून उन्मार्गी होतील व सांप्रदायिक लोकांचा उच्छेद होईल. म्हणजे पर्यायानें मी या लोकांचा घात करणारा होईन. त्यानें वर्णसंकर होईल. एतावता कामी लोक अज्ञानामुळें काम्य कर्में करीतच राहतात पण आसक्त न होऊन लोकांच्या कल्याणाकरतां विद्वानानें निष्काम कर्म करावें व तें मला अर्पण करावें. गुण व कर्म यांपासून आत्मा अगदीं अलिप्त आहे असें जो मानतो, तसेंच इंद्रियें आपल्या विषयांकडे प्रवृत्त होतात हें ज्याला समजतें तो कर्मांत आसक्ति ठेवीत नाहीं

व त्यासच निष्काम कर्म साधतें. परंतु ज्याची बुद्धि अहंकारानें प्रेरित होऊन मी सर्व करतों असें ज्याला वाटतें तो कर्मासक्त होतो व निष्काम कर्म करूं शकत नाहीं. तथापि तीन गुणांनीं मोहित होऊन त्याची जी निरलसपणें फलाशेनें कर्म करण्याची बुद्धि आहे तिचा विद्वानानें भेद करूं नये. ज्ञानवान् सुद्धां प्रकृतीच्या वळणावर जातो व प्रकृतिस्वभावानुरूप कर्म करतो. तेथें आग्रह धरणें व्यर्थ आहे. कारण साङ्ग अशा परधर्माहून अगुण असा स्वधर्म प्रशस्त आहे. स्वधर्मामध्यें मृत्यु आलेला पतकरेल. कारण परधर्म भयावह आहे.

## पाप.

वरेण्य म्हणतोः—हे हेरंबा ! पुरुष जें पाप करतो तें करण्याची आकांक्षा नसतां बलात्कारानें त्याला कोण प्रेरणा करतो ?

गजानन म्हणतोः—गुणांपासून उत्पन्न झालेले हे महापापी शत्रू काम व क्रोध लोकांना वश करतात. ज्याप्रमाणें माया, बाष्प व मेघ अनुक्रमें जगाला, जलाला, व सूर्याला आच्छादित करतात त्याप्रमाणें काम व क्रोध ज्ञानाला आच्छादित करतात. आणि बुद्धि, मन व इंद्रियें यांच्या आश्रयानें ज्ञानी पुरुषास मोह पाडतात. म्हणून अगोदर इंद्रियनिग्रह करावा आणि ज्ञान व विज्ञान नाहींशीं करणारें पाप जिंकावें. देहाहून इंद्रियें श्रेष्ठ, इंद्रियांहून मन श्रेष्ठ, मनाहून बुद्धि श्रेष्ठ व बुद्धीहून आत्मा श्रेष्ठ याप्रमाणें शुद्ध मनानें आत्म्यास जाणून इंद्रियनिग्रह करून कामरूपी शत्रु नाहींसा करावा.

पुढें गणपति म्हणतोः—हा योग मी प्रथम सृष्टिसमयीं विष्णूस सांगितला, त्यानें सूर्यास सांगितला व सूर्यानें मनूस सांगितला.

वरेण्य म्हणतोः—तूं तर गर्भांतून आतां या कालीं उत्पन्न झालास !

गणपति म्हणतोः—बाबारे ! तुझे व माझे अनेक जन्म झाले. ते मला आठवतात. तुला आठवत नाहींत. विष्णु इत्यादि देव माझ्यापासून उत्पन्न होतात ते प्रलय कालीं माझ्यांत लय पावतात. मी त्रिगुणात्मक मायेचा आश्रय धरून निर्माण होतों. जेव्हां अधर्माची वृद्धि व धर्माची हानि होते तेव्हां साधूंचें रक्षण करण्यास, दुष्टांस शिक्षा करण्यास व धर्माची स्थापना करण्यास मी जन्म घेत असतों. हें माझें रूप जो संक्षेपानें जाणतो, व अहंममता बुद्धि सोडतो तो पुन्हां जन्मास येत नाहीं. जे जे माझी ज्या ज्या भावनेनें सेवा करतात त्या त्यांस त्या त्या भावनेप्रमाणें मी स्फुट फल देत असतों. कर्मांच्या फलास्तव जे देवतांवर प्रीति करतात त्यांस कर्माप्रमाणें त्वरित सिद्धि प्राप्त

होते. पण मी अकर्ता आहें, निस्पृह आहें, कर्मांनीं अलिप्त आहें इत्यादि माझें स्वरूप जो जाणतो त्यास कर्में बंधन करीत नाहींत.

## कर्म व अकर्म.

पुढें गणपति म्हणतोः—कर्माची गति गहन आहे. त्या बाबतींत ऋषीसुद्धां मोह पावले आहेत. इंद्रियें विषयांकडे प्रवृत्त होतात, आत्मा कर्मापासून अलिप्त आहे व कर्म-शून्य आहे म्हणून देहाकडून जीं कर्में घडतात त्यांच्या ठायीं जो अकर्म दृष्टि ठेवतो व देह आणि इंद्रियें यांना स्थिरत्व आणल्यानें जी अकर्मस्थिति प्राप्त होते तेंच कर्म अशी जो दृष्टि ठेवतो तोच या लोकांत संपूर्ण कर्म करणारा व मुक्त होय. कर्मांकुराच्या वियोगानें म्हणजे कामसंकल्परहित जो कर्मांस आरंभ करतो व ज्यानें तत्त्वज्ञानाच्या योगानें आपलीं कर्में दग्ध केलीं आहेत त्याला ज्ञानी म्हणतात. फलेच्छा व साधनें सोडून जो तृप्त राहतो तो कर्म करावयास उद्युक्त झाला तरी कांहीं एक करीत नाहीं. जो निरीच्छ, आत्मसंयमी, सर्व परिग्रहाचा त्याग करून केवळ गृहकर्म करीत राहतो त्यास पातक लागत नाहीं. शीतोष्ण द्वंद्वरहित होऊन मिळेल त्यावर निर्वाह करणारा कर्मानें बद्ध होत नाहीं. सर्व विषयांपासून मुक्त होऊन जो ज्ञानविज्ञानवान् प्राणी विष्णूकरतां यज्ञकर्म करतो त्यानें तो बद्ध होत नाहीं. सर्व यज्ञांत ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे, त्यांत सर्व कर्म लीन होतें. ज्ञान हें सत्संगापासून प्राप्त होतें. जो भक्तिहीन, अश्रद्धालु, सर्वत्र संशय घेणारा असतो त्याला ज्ञान प्राप्त होत नाहीं. सुख मिळत नाहीं. इहलोक नाहीं व परलोक नाहीं. आत्मज्ञानवान् पुरुष ज्याचीं कर्में ज्ञानानें दग्ध झालीं आहेत व ज्याचे संशय नष्ट झाले आहेत तो बद्ध होत नाहीं.

## कर्मयोग व कर्मन्यास.

वरेण्य म्हणतोः—आतां प्रभो प्रथम कर्मयोग व नंतर कर्मन्यास सांगितलात. तर यांतून अधिक श्रेयस्कर काय तें मला सांगा.

गणपति म्हणतोः—दोन्ही—कर्मयोग व कर्म संन्यास—मोक्षाचीं साधनें आहेत पण त्यांतून कर्मयोग हा कर्मसंन्यासा पेक्षां श्रेयस्कर आहे. केवळ कर्म सोडणें यास ज्ञानी पुरुष कर्मन्यास म्हणत नाहींत. मनानें सर्व कर्मांचा त्याग करून कर्मयोग्यानें सुखरूप व्हावें.

वरेण्य म्हणतोः—**त्रिभुवनांत सुखरूप काय आहे ?**

गणपति म्हणतोः—आत्मनिष्ठाचें सुख नष्ट न होणारें असतें. विषयांपासून उत्पन्न होणारीं सुखें उत्पन्न होतात व नष्ट होतात अत एव दुःखाचीं कारणें आहेत. त्यांत आसक्त होऊं नये. काम क्रोध जिंकून, अहंकार सोडून, सर्व संशय नाहींसे करून अंतरात्म्यांत रति ठेवणाऱ्या सर्व भूतांचें हितकरण्यांत मग्न असलेल्या ज्ञानी पुरुषास ब्रह्म स्पष्ट दिसतें.

गजानन पुढें म्हणतोः—प्राणायामानें प्राणापान वश करावे म्हणजे वश झालेले सिंह व्याघ्र व हत्ती जसे हरिणादिकांस पीडा करीत नाहीं तसा स्थिर केलेला प्राण पाप नाहींसें करून शरीरास पीडा देत नाहीं. मग योग साधन करावें व त्रिकालज्ञ व्हावें व त्रैलोक्य वश करून घ्यावें. म्हणजे संपूर्ण जगत् आपल्या अंतरात्म्यांत दिसतें.

शेवटीं गणपति म्हणालाः—निष्क्रिय योग्यापेक्षां सक्रिय योगी म्हणजे फलाची इच्छा न करतां श्रौत स्मार्त कर्में करणारा योगी प्रशस्त होय. योगारंभ क्रियेंत असतो व त्याची पूर्णताही क्रियेंत असते कारण शमदमाची योग्यास अवश्यकता आहे. तशीच गुरुप्रसाद व सत्संगति यांची वैराग्य प्राप्तीला अवश्यकता आहे.

## या जगांत ज्ञेय काय आहे ?

जें जाणलें असतां बन्ध प्राप्त होत नाहीं तें ज्ञेय. पुढें गणपति म्हणाला मी तुला एक तत्त्व सांगतों तें जाणल्यानें तूं मला—सर्वेश्वराला—जाणशील व बन्धनापासून मुक्त होशील. प्रथम तूं माझी प्रकृति जाण. पृथ्वी, अग्नि, आकाश, अहंकार, जल, बुद्धि, वायु, सूर्य, चंद्र व यज्ञ करणारा यजमान अशी माझी प्रकृति आहे. या शिवाय माझी दुसरी प्रकृति आहे. ती जीवभावास प्राप्त होऊन सर्व त्रिभुवनास व्यापून राहिली आहे या दोन प्रकृतींपासून चराचर जग उत्पन्न झालें आहे. अशा विश्वाची उत्पत्ति त्याचें रक्षण व लय मी करतों. माझें तत्त्व जाणण्यास एकादाच यत्न करतो व एकादाच तत्त्वाला पोंचतो. तो माझ्याहून अन्य कांहीं पहात नाहीं व माझ्यांत सर्व पहातो. तो पृथ्वीमध्यें सुगंधरूपानें, अग्नीमध्यें तेजोरूपानें, सूर्यामध्यें प्रभारूपानें व जल आणि सोम यांत रसरूपानें मला पहातो. मी बुद्धिवानांची बुद्धि आहें व बलवन्ताचें बल आहे. त्रिभुवनांत जें जें श्रेष्ठ आहे तें तें माझी विभूति आहे. ज्या मतीनें माझी उपासना कोणी करील ती मी त्याची पुरवतों. अनन्यशरण होऊन माझी भक्ति करतो त्याचा योगक्षेम मी चालवतों.

अंतकालीं माझें स्मरण करून जो प्राण सोडतो तो मुक्ति पावतो. इतर देवतांचें

अंतकाळीं स्मरण करून त्यांचे लोक त्यास प्राप्त झाले तरी तो पुन्हां पतन पावतो. निःसंदेह होऊन मला मिळतो तो पतन पावत नाहीं. हे राजा पुरुषाच्या दोन गति आहेत १ शुक्ल व १ कृष्ण; या दोन गती क्रमानें ब्रह्म व संसार यांची प्राप्ती करून देतात.

वरेण्य म्हणतो—ब्रह्म कोणतें व संसार कोणता तें कृपा करून मला सांगा.

गजानन म्हणतो—दृश्य व अदृश्य जें सर्व आहे तें ब्रह्म समज, पंचमहाभूतांपासून झालेलें जें सर्व दिसत आहे तें क्षर आहे व त्यांत असणारें जें तत्त्व तें अक्षर आहे. व या दोघांहून निराळें आहे तें सनातन व शुद्ध ब्रह्म आहे.

अनेक जन्मांचा संभव यासच संसार ह्मणतात. जे माझी गणना करीत नाहींत ते संसारांत पडतात. पण जे माझी उपासना करतात ते परब्रह्मास प्राप्त होतात. ध्यान व पंचामृतादि उपचार यांनीं जो माझी भक्तीनें उपासना करतो, त्याचे मनोरथ मी पूर्ण करतों. मानसिक पूजा सर्वांत श्रेष्ठ आहे. कोणतीच इच्छा मनांत धरल्याशिवाय जी पूजा केलेली असते ती उत्तम समजावी. चित्तवृत्ती आकर्षण करून विधियुक्त न्यास करून मंत्र जप करून स्तोत्र पाठ करावा म्हणजे त्यास अव्यय मोक्ष प्राप्त होतो. माझ्या आश्रयानें चारी वर्णांचे पुरुष व स्त्रिया मुक्त होतात. नंतर वरेण्याच्या विनंतीवरून गजाननानें त्यास दिव्यचक्षू देऊन आपलें परम अद्भुत व दुर्निरीक्ष्य असें

## विश्वरूप

दाखविलें. त्याला असंख्य मुखें, नेत्र, हात व पाय होते. तें दिव्यभूषणें वस्त्रें व सुगंधि माला व आयुधें यांनीं युक्त होतें. त्याला कोटिसूर्यांची प्रभा होती. त्यांत पृथक्पणें तिन्हीं लोक होते. असें ईश्वराचें परम अद्भुत रूप पाहून गजाननास नमस्कार करून वरेण्य म्हणाला " तुझ्या देहांमध्यें देव, ऋषी, पितर, तशींच समुद्र, द्वीपें, पाताळें व पर्वत यांचीं सप्तकें पहात आहें. हे विभो ! भूमि, आकाश, स्वर्ग त्यांत आहेत. मनुष्यें, सर्प, राक्षस ब्रह्मा विष्णु महेश, इंद्रादि देव, व अनेक प्रकारचे प्राणी आहेत. त्याला अंत नाहीं. आदि नाहीं. तें अप्रमेय आहे, पुरातन आहे. तें दुर्निरीक्ष्य आहे पण आनंदकारक आहे. त्यांतच विद्याधर, यक्ष किन्नर अप्सरा नाचत आहेत, गन्धर्व गात आहेत. वसुरुद्रादि तुझी सेवा व भक्ति करीत आहेत. तुझ्या विचित्र रूपाला सर्व लोक तसाच मी भीत आहें. प्रलयानलानें दीप्त झालेलें तुझें विक्राळ दाढांनीं युक्त, नभाला स्पर्श करणारें

रूप पाहून, हे गणेश ! मी उद्भ्रान्त झालों आहे. मनुष्यनागादि नानायोनि भोगणारे पापी शेवटीं तुझ्यामध्यें प्रवेश करीत आहेत. मेघापासून जसे जलबिन्दू तसे सागररूपी तुझ्यापासून हे उत्पन्न झाले आहेत. तुझें पूर्वीचे सौम्यरूपच मला दाखव." असें वरेण्य म्हणतांच गजानन पुन्हां सौम्यरूप धरिता झाला.

## मूर्तियुक्त ईश्वराची पूजा विरुद्ध अव्यक्त अक्षराची पूजा.

वरेण्य म्हणतोः—मूर्तियुक्त ईश्वराची पूजा अधिक किंवा अव्यक्त अक्षराची पूजा अधिक तें मला सांगा.

गजानन म्हणतोः—अव्यक्तोपासना दुःखकर आहे. सगुणाच्या उपासनेनें जें साध्य होतें तेंच अव्यक्त भक्तीनें मिळतें. भक्तीनें च माझ्या ठायीं मन व बुद्धि लाव. आपलें अंतःकरण मला अर्पण करण्यास असमर्थ असलास तर अभ्यास व समभाव यांच्या योगानें माझी प्राप्ति करून घेण्याची खटपट कर. हेंही करण्यास असमर्थ असशील तर त्रिविध कर्मांचा फलत्याग कर. अभ्यासाहून बुद्धि, बुद्धीहून ध्यान, ध्यानाहून कर्मत्याग व कर्मत्यागाहून शान्ति श्रेष्ठ आहे. जो इष्टानिष्ट सारखींच मानतो व क्षेत्र क्षेत्रज्ञ यांस जाणतो तो मला प्रिय होतो.

## क्षेत्र, क्षेत्रज्ञ व क्षेत्रज्ञान

वरेण्य म्हणतोः—मला क्षेत्र, क्षेत्रज्ञ व क्षेत्रज्ञान हीं सर्व कृपा करून समजून सांगा.

गजानन म्हणतोः—अव्यक्त, बुद्धि, अहंकार, मन, पंचतन्मात्रें, पंचमहाभूतें, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, इच्छा, संस्कार, धैर्य व द्वेष, शिवाय चेतनेसह सुख दुःख या सर्वांच्या समुदायास क्षेत्र म्हणतात. सर्व भूतांच्या अंतर्यामीं राहणारा मी क्षेत्रज्ञ समज. क्षेत्र व क्षेत्रज्ञ हीं दोन्हीं ज्ञानाचा विषय समज.

आर्जव, गुरुसेवा, विषयांपासून विरक्ति, शौच, शान्ति, दंभराहित्य, जन्मादिकांच्या ठायीं दोषदृष्टि सर्वत्र समानदृष्टि, दृढभक्ति, अव्यभिचारित्व, शम आणि दम यांनीं युक्त जें ज्ञान तेंच ज्ञान असें समज.

जें अनादि, इंद्रियरहित, गुणशून्य असून गुणांचा भोग घेणारें, अव्यक्त, सत् व असत् यांहून भिन्न, इंद्रियें व विषय यांचें भासक, विश्वास धारण करणारें व सर्वव्यापी ब्रह्म तें एक असून नाना असल्यासारखें भासतें. हें पुरातन ज्ञेय ज्ञानगम्य परब्रह्म आहे. हेंच अव्यय परमात्मा आहे.

प्रकृतीहून पर असलेला पुरुष प्रकृतीहून उत्पन्न झालेल्या गुणांचा भोग घेतो. तीनगुणांच्या योगानें ही प्रकृति पुरुषास देहांमध्यें दृढबद्ध करते.

ज्यावेळीं प्रकाश व शांति असते तेव्हां बुद्धीचें सत्व अधिक असतें. लोभ, अक्षम स्पृहा कर्मारंभ हीं रजोगुणांचीं लक्षणें समजावी. मोहवृत्तीचा अभाव, अज्ञान व प्रमाद हे तमाचे गुण आहेत. सत्वाचें आधिक्य झालें तर सुख व ज्ञान प्राप्त होतात. रजोगुणाच्या आधिक्यानें कर्मासक्ति होते व तमोगुणाच्या आधिक्यानें निद्रा, आलस्य व दुःख हीं प्राप्त होतात. तिघांच्या वृद्धीनें मुक्ति संसार व दुर्गति हीं क्रमानें प्राप्त होतात.

वरील तीनगुणांच्या लक्षणांवरून प्रकृति तीन प्रकारची म्हणजे दैवी, आसुरी व राक्षसी असते.

हे राजा तूं सत्वयुक्त होऊन माझी भक्ति कर. भक्ति सुद्धां वरील गुणधर्मांनीं सात्विक, राजस, व तामस, अशी तीन प्रकारची आहे. सात्विक भक्तीचें फल शुभ आहे. राजस भक्तीनें जन्म मरण प्राप्त होतें. भूत, प्रेतादिकांची पूजा करणें, कामुक कर्म करणें, आपल्या देहाला व त्यांत असलेल्या मला शुष्क करणें, व या सर्वांविषयीं आग्रह धरणें याला तामस भक्ति म्हणतात. तिनें नरक प्राप्त होतो. त्याचीं द्वारें काम क्रोध, लोभ व दंभ हीं आहेत; म्हणून त्यांचा त्याग करावा.

तपहीं याच प्रकारानें सात्विक, राजस व तामस आहे. तसेंच दानही त्रिप्रकारक आहे. देश, काल व पात्र पाहून श्रद्धेनें दिलेलें दान सात्विक समज, उपकार किंवा फल यांची इच्छा करणाऱ्या पुरुषाकडून भक्तीनें व क्लेशानें घडलेलें ज्ञान राजस समज. अयोग्य देश, अयोग्य काल व अयोग्य पात्र पाहून अवज्ञायुक्त व सत्कार-रहित केलेलें दान तामस समज. ज्ञानही त्रिप्रकारक आहे. नानाप्रकारच्या भूतांमध्यें जो मला एकाला़चा पाहतो त्याचें ज्ञान सात्विक होय. अनेक प्रकारच्या भूतांत जो मज अव्यय अशा ईश्वरास भिन्न भिन्नपणें पहातो त्याचें ज्ञान राजस होय. देह हाच आत्मा अशा प्रकारचें खोटें ज्ञान तें तामस होय. याचप्रमाणें पहातां कर्मही त्रिप्रकारक आहे. कर्तेही त्रिप्रकारक आहेत. त्याप्रमाणें सुख दुःख हीं त्रिप्रकारक आहेत. जें प्रथम विषवत् भासतें पण शेवटीं दुःखाचा अंत करणारें अमृतमय होतें तें सदा इच्छयमान असलेलें सुख सात्विक होय. ज्याच्या योगानें जे विषय प्रथम अमृताप्रमाणें भासतात व शेवटीं तेच विषय विषाप्रमाणें वाटतात तें राजस सुख होय. तंद्रा प्रमाद व आळस यांपासून उत्पन्न झालेलें व आत्म्यास मोहित करणारें सुख तामस होय.

पुढे गणपति म्हणतो " हे राजा ! या त्रिविध गुणांनीं रहित असलेलें असें या सृष्टींत काहीं नाहीं. ब्रह्मसुद्धां ओं, तत् व सत् या प्रकारानें तीन प्रकारचें आहे. सर्व

वर्णांच्या लोकांनीं आपली शास्त्रविहित कर्में करावीं व मदर्पण करावीं म्हणजे माझ्या प्रसादानें स्थिर व परम पद प्राप्त होतें.

असो. भगवद् गीतेच्या १८ अध्यायांचें गणेश गीतेंत ११ अध्यायांत सार काढलेलें आहे असें या दोन्हीं गीता वाचल्या म्हणजे लक्षांत येईल. पण त्यांत एक औचित्य दाखविलें आहे तें असें. भीष्म द्रोणादिकांस मीं युद्धांत कसें मारूं व त्यांच्या रक्तानें माखलेले भोग कसे भोगूं! अशी शंका घेऊन शस्त्रन्यास करणाऱ्या अर्जुनास हृदयदौर्बल्य सोडून हातांत शस्त्र घेऊन युद्ध कर असा उपदेश कृष्णाच्या मनांत करावयाचा होता. म्हणून आत्म्याला शस्त्रें च्छेदित नाहींत, अग्नि जाळीत नाहीं, वायु सुकवीत नाहीं अशा शब्दांची योजना केली; परंतु गणेशगीतेंत वरेण्याला नुसता मोक्षोपदेश करावयाचा आहे म्हणून आत्म्याला उद्देशून योजलेले हे सर्व शब्द, जें ब्रह्म, वरेण्याला जाणावयाचें होतें त्याला उद्देशून योजलेले आहेत (पहा पृष्ठ ३८). त्याचप्रमाणें अर्जुनाला जें कृष्णानें विराट्स्वरूप दाखविलें आहे त्यांत धृतराष्ट्राकडील भीष्मद्रोणादि वीर ससैन्य विक्राळ मुखांत शिरत आहे व कित्येक दाढांखालीं चुरडत आहेत असें दाखविलें आहे. तें युक्त आहे कारण कृष्ण म्हणतात "अरे मी यांना आधींच मारिलें आहे असें समज. तूं निमित्त मात्र आहेस." यानें अर्जुनाचा युद्ध न करण्याचा मोह नष्ट झाला. (पहा भगवद्गीता अध्याय ११). गणेश पुराणांत युद्धाचा व हत्येचा प्रश्नच नव्हता. प्रश्न होता तो मोक्षाचा म्हणून परमेश्वराच्या मुखांत "नाना योनि भोगणारे पापीच प्रवेश करीत आहेत" असें म्हटलें आहे.

दुसरी एक गोष्ट यांत लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती अशी कीं गणेशगीता ही भगवद्गीतेचाच सारभूत अनुवाद आहे, व ज्या अर्थी गणेश गीतेंत कर्मयोगाचें महत्व गाइलेलें आहे त्या अर्थीं भगवद्गीतेचा खरा अभिप्रायही कर्मयोगाचेंच महत्व गाण्याचा असला पाहिजे. भगवद्गीता प्रवृत्तिपर आहे, निवृत्तिपर नाहीं हा रहस्यकारांचा समज केवळ हटवाद अथवा नवीन थोताण्ड नसून निदान गणेशपुराणा इतका तरी जुन्या पंडितांस मान्य झालेला भगवद्गीतेचा खरा अभिप्राय आहे.

# प्रकरण सहावें.

## गणेश पुराणांतील सुभाषित.

। पृथिव्यां त्रीणिरत्नानि जलमन्नं सुभाषितम् ।
॥ मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते ॥ १ ॥

( अर्थः—सर्व पृथिवी धुंडाळून पाहिलें असतां तीनच रत्नें सांपडतात. १ जल, २ अन्न, व ३ सुभाषित. मूढ लोकांकडून मात्र केवळ पाषाणांच्या तुकड्यांस रत्न ही संज्ञा देण्यांत येत आहे. )

गणेशपुराणाच्या कर्त्याच्या अंगांत सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची शक्ति व कवीची असाधारण कल्पकता आहे; क्वचित् प्रसंगीं तिचा प्रभाव चांगलाच दृष्टोपत्तीस येतो. उदाहरणार्थ. कांहीं कमळें चंद्रदर्शन होतां विकास पावतात हा नेहमीं रात्रीसच घडून येणारा चमत्कार पाहून मैथिलीय चक्रपाणीच्या उग्रानामक सुंदर स्त्रीच्या लावण्याचें वर्णन करतांना तिच्या मुखाला जी चंद्राची उपमा साध्या कवीनें दिली असती ती न देतां गणेशपुराण कर्ता म्हणतो—

**कुमुदानि विकासन्ते दिवि यन्मुखचंद्रतः ॥ १३ ॥** ( खं. २ अ. ७३ )

( अर्थः तिचा मुखचंद्र पाहून भर दिवसा कुमुदें विकास पावतात ! )

हें वर्णन फार वहारीचें आहे. चंद्राचा अस्त झाल्यामुळें ही कुमदवती माझ्या दृष्टीला आनंदवीत नाहीं, * असा विलाप करणारा कालिदास वरील प्रकार पाहता तर नाचला असता. त्याचप्रमाणें पौर्णिमेनंतर कलेकलेनेंच चंद्र क्षीण होत जातो हा सृष्ट चमत्कार पाहून रुद्रकेतूच्या शारदा नामक सुन्दर स्त्रीच्या मुखाला नुसत्या चंद्राची उपमा न देतां प्रस्तुत कवि म्हणतो

**यद्वक्त्रनिर्जितश्चंद्रश्चिन्तया क्षयमीयिवान् ॥ २५ ॥** ( खं. २ अ. १ )

( अर्थः—हिच्या मुखानें पराजित केल्यामुळें चंद्राला क्षयरोग झाला आहे. )

---

॥ * दृष्टिं न नंदयतिसैव कुमुद्वतीमे ॥ ( कालिदासकृत शाकुन्तल )

या कवीच्या असल्या अप्रतिम चातुर्याचा सन्मान करण्याकरतां कांहीं श्लोक नमुना म्हणून या प्रकरणांत दिले आहेत.

### इकडे आड व तिकडे विहीर.

**इतः कूप इतो वापीत्येवं प्राप्तं मया कथम् ॥ ३० ॥** ( खं. १ अ. १३ )

( अर्थः—इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति मला कशी प्राप्त झाली ? )

### वचन.

**मेरुश्चलेत् पतेत् सूर्यो वन्हिः शीतो भवेत् यदि ।**
**मर्यादामुत्सृजेत् सिन्धुर्वचोमे नानृतं भवेत् ॥ २४ ॥** ( खं. १ अ. ६१ )

( अर्थः—एकवेळ मेरू आपलें स्थल सोडील, सूर्य पतन पावेल, समुद्र आपली मर्यादा सोडील पण माझें वचन केव्हांही असत्य होणार नाहीं. )

### शरीरकंप.

**स्वेदस्रावि शरीरं मे कंपते बोधिपत्रवत् ॥ ७ ॥** ( खं. १ अ. ३४ )

( अर्थः—घामाघुम झालेलें माझें शरीर बोधिपत्राप्रमाणें कांपू लागलें आहे ).

### दण्ड.

**दण्डस्य हि भयाल्लोकाः स्वे स्वे धर्मे व्यवस्थिताः ।**
**अन्यथा नियमोन स्यात् पारक्यं स्वीयमित्यदः ॥ ३४ ॥** ( खं. १ अ. ३ )

( अर्थः—दण्डाच्याच भयानें लोक आपआपल्या धर्माप्रमाणें वागतात तसें नसतें तर हा परकी हा स्वकीय असा कांहीं नियम राहता नाहीं. )

### अधमकृत निन्दा व स्तुति.

**अधमो यदि निंदेत स्तुवीत यदि वा क्वचित् ।**
**नक्रुध्येन्न च तुष्येच्च किं तया किं तयापि च ॥ ३५ ॥** ( कित्ता )

( अर्थः—अधम पुरुषानें जरी निंदा केली—सहसा तो निंदाच करतो—पण त्यांतून जरी त्यानें क्वचित्प्रसंगीं स्तुति केली तरी राग येऊं देऊं नये अथवा संतोष वाटूं देऊं नये; कारण हींत किंवा तींत—म्हणजे त्यानें केलेल्या निंदेंत अथवा स्तुतींत कांहीं अर्थ नसतो.)

### मंत्रगोपन.

**मंत्रगुप्तिः सदाकार्या तन्मूलं राज्य मुच्यते ॥ ३७ ॥** ( कित्ता )

( अर्थः—मसलत नेहमीं गुप्त ठेवावी. ती राज्याचें मूळ आहे.)

## सौहार्द.

**अमात्यानां प्रजानांच भृत्यानां चित्तहृत् भवेत् ४१** ( किता )

( अर्थः—अमात्यांचें प्रजाजनांचें व भृत्यांचें हृदय राजानें हरण करावें. )

## भृगूंचा आश्रम.

**मंत्रघोषयुतं प्राप भृगोराश्रममंडलम् ॥ १८ ॥**
**नानापुष्पलताकीर्णं नानापक्षिविनादितम् ।**
**मार्जारा नकुलाः श्येनाः गजा गावो मयूरकाः ॥ १९ ॥**
**भुजगाः पक्षिणः सिंहाव्याघ्राः क्रीडान्ति यत्रच ।**
**न च वायुर्भृशं वाति न सूर्यस्तपते भृशम् ॥ २० ॥**
**न वर्षति भृशं मेघो वर्षतेच तदिच्छया ।** ( खं. १ अ. ६ )

( अर्थ [ मग पुढें त्यांना ] भृगूच्या आश्रमाचें मंडल लागलें. तेथें वेदमंत्रांचा घोष चालला होता. नानाप्रकारच्या पुष्पलतांनीं तें स्थान भरलेलें होतें. विविध प्रकारच्या पक्ष्यांच्या निनादानें तें गजबजलेलें होतें. माजरें, मुंगसें, ससाणे, हत्ती, गाई, मोरें, सर्प, पक्षी, सिंह, व्याघ्र इ० तेथें जातिवैर टाकून क्रीडा करीत होते. वारा वेगानें वहात नसे, सूर्य फार ताप देत नसे. मेघ प्रचण्ड वर्षाव करीत नसे. त्याच्या [ भृगूच्या ] इच्छेप्रमाणें यांचें काम होतसे. )

याच मासल्याचीं पुराणांत आश्रमांचीं वर्णनें येतात. त्यांत एका तऱ्हेची निसर्गरमणीयता मनांत आदर उत्पन्न करते.

## मूकबधिर वक्ता व श्रोता.

**यः कथान्तं न प्रयाति श्रोतावक्ताऽथवा द्विजाः ॥ ३ ॥**
**लिख्यमानं वाचयति पुस्तकं हरतेऽपिवा ।**
**न पृच्छति च यः शिष्यः गुरुः पृष्टो न वक्ति चेत् ॥ ४ ॥**
**उभौ तौ मूक बधिरौ लोके दृष्टौ द्विजोत्तमाः ।** ( खं. १ अ. ७ )

( अर्थः द्विज हो ! श्रोता अथवा वक्ता आरंभ केलेली गोष्ट शेवटास नेऊं देत नाहीं अथवा कोणी लिहीत असतां जो वाचतो, किंवा जो पुस्तक हरण करतो, जो शिष्य शंका विचारीत नाहीं व विचारली असतां तिचें निरसन करण्यास जो गुरु तोंड उघडीत नाहीं, ते दोघेही मूक व बहिरे लोकांत आढळून येतात असें उत्तम ब्राह्मण हो ! तुम्हीं समजा. )

★ ग्रं. क्र. ३७७ ५१

### पाप्याची संगति.

**परं संचरते पापं सहयानासनाशनात् ॥ १७ ॥** ( खं. १ अ. ८ )

( अर्थः संभाषण, बरोबर गमन, आसन व भोजन यांनीं एकाचें पाप दुसऱ्याकडे जातें. )

### वीर्य.

**सहसा दहते सर्व लघुरेव हुताशनो ।**
**लघुदीपो महत् रात्रौ यथा संहरते तमः ॥ २६** ( खं. १ अ. १८ )

( अर्थः—अग्नि थोडा झाला तरी सर्वांला जाळतो. जसा दीप लहान असला तरी मोठ्या रात्रीस तमाचा संहार करतो. )

### साधुसंगति

**साधूनां संगतिःसद्यो ददाति फलमुत्तमम् ॥ ३३ ॥** ( खं. १ अ. १९ )

### ग्राहकशक्ति.

**सच श्रवणमात्रेण जग्राह गुरुणोदितम् ॥ २४ ॥** ( खं. १ अ. २८ )

( अर्थ—तो [ रुक्मांगद राजा ] गुरुच्या तोंडांतून विद्या निघाली नाहीं तोंच ती ग्रहण करी. )

### स्त्रीधर्म

**भर्तुः शुश्रूषणादन्यो धर्मोनास्ति स्त्रियाः क्वचित् ॥ २० ॥**( खं. १ अ. ३० )

( अर्थः—पतीच्या सेवेशिवाय स्त्रियांना दुसरा धर्म क्वचितच असतो. )

### लोकांस न सांगण्यासारख्या कांहीं गोष्टी.

**मंत्रायुर्गृहरंध्रश्रीरतयश्रौषधानि च ।**
**मानापमानदानानि प्रकटानि न कारयेत् १२** ( खं. १ अ. ३१ )

( अर्थ. मंत्र, आयुष्य, गृहच्छिद्र, संपत्ति, रति, औषध, मान अपमान व दान हीं लोकांत प्रकट करूं नयेत )

### स्वपरबुद्धि

**स्वबुद्धिर्हितकृत् सर्वा विनाशाय परेरिता**
**गुरोर्गरीयसी बुद्धिः क्षयदा कामिनीमतिः ॥ २४ ॥** (खं. १ अ. ३१)

( अर्थ-आपली स्वताची बुद्धि हितकारक असते. दुसऱ्यानें सुचवलेली मात्र नाशाला

कारण होते. पण गुरूची बुद्धि ती वृद्धि करते. कामिनीची बुद्धि तशी नाहीं ती क्षयास हेतु होते. )

## भिक्षेची हांडी

**आरुरुक्षेत् कथं भिक्षापात्रं शिक्यं महत्तरम्॥ ४०॥** (खं.१ अ. ७५)

( अर्थ-भिक्षेची हांडी उंच शिक्यावर कशी चढणार ? )

## कार्य कोणतें ?

**इहलोके तु तत्कार्यं येन सौख्यं परे भवेत्।**
**पूर्वे वयसि तत्कार्यं येन शं वार्धकेभवेत्॥ ३४॥**
**अष्टमासेषु तत्कुर्याद्येन वर्षासु शं भवेत्**
**दिवसे कर्म तत्कार्यं येन रात्रौ सुखं भवेत् ३५** (खं.१अ.७६)

( अर्थ-जेणें करून परलोकीं सौख्य होईल असें कार्य या लोकीं करावें. जें केलें असतां वृद्धपणीं कल्याण होईल तें पूर्ववयांत करावें. वर्षाकालांत हितप्रद होणारें मागील आठ महिन्यांत करावें. तें कार्य दिवसास करावें कीं जे रात्रीं सुखावह होईल. )

## रेणुकेचें सौंदर्य

**यस्यालावण्यगुञ्जाऽपि पत्न्याःकामस्य नाभवत्॥ ५॥**
**रतिरित्येवलोकेषु विख्याताभूत् ततस्तु सा।**

* * * *

**यन्नेत्रशोभासंप्राप्त्यै चकोराजलवासिनः ॥ ७॥**
**हरिणाश्च तपश्चेरुर्वने चछंदतृणाशिनः।**
**यदास्य शोभा संप्राप्त्यै सेवते चंद्र ईश्वरम्।**
**अनादिनिधना देवी मूलप्रकृतिरीश्वरी ॥८॥** (खं. १ अ. ७७.)

( अर्थ—तिच्यांतील गुंजभर लावण्य मदनपत्नीच्याठायीं दिसेना तेव्हांपासून त्या मदनपत्नीचें नांव रति असें लोकांत प्रख्यात झालें. तिच्या नेत्रसौंदर्याची प्राप्ति व्हावी म्हणून चकोर जलनिवासी होऊन व हरिणें मिळेल तसें तृण खाऊन वनांत तप करूं लागलीं. तिच्या मुखाची शोभा मिळावी म्हणून ईश्वराच्या भालीं राहून त्याची चंद्र सेवा करूं लागला आहे. अहो अनादि व अनंत अशी जी देवी मूलप्रकृति ईश्वरी आहे तीच ही आहे ! )

## भाव तसा देव

**यस्य यस्य यथा भावस्तादृशं सोऽभ्यवीक्षत ।**
**यथा रक्ते सिते पीते स्फटिकस्तादृशाकृतिः ॥ २१ ॥**
( खं. २ अ. १३ )

( अर्थ—जसा स्फटिक तांबड्या, पांढऱ्या व पिवळ्या पदार्थावर ठेवला म्हणजे तो अनुक्रमें तांबडा, पांढरा व पिंवळा दिसतो तसा भिन्न भिन्न जसा काशीराजाच्या प्रजेचा भाव होता तशा आकृतीचा विनायक दिसूं लागला. )

## रहस्यरहित वचन.

**ते ऊचुर्न रहस्यं, यत् स्वाभिप्रेतमृते वचः ॥ ५ ॥** ( खं २ अ २२)
( अर्थ—ते म्हणाले ज्यांत मनांतील अभिप्राय व्यक्त केलेला नसतो त्या वचनांत कांहीं रहस्य नसतें. )

## स्वभाव

**यस्य स्वभावो यादृक्स्यात् स तथा वर्तते नरः**
**न जहाति घृष्यमाणश्चंदनः स्वसुगन्धिताम् १२**
**कस्तुरीकर्दमयुतः पलांडुर्वा निजं गुणम् ।** ( कित्ता )

( अर्थ—जसा ज्याचा स्वभाव असतो तसा तो वर्तूं लागतो. किति घांसला तरी चंदन आपली सुगन्धिता सोडीत नाहीं. कस्तुरी कर्दमानें युक्त झाली तरी आपला गुण ती टाकीत नाहीं. त्याच प्रमाणें कांहीं केलें तरी पलाण्डु आपला वास लपवूं शकत नाहीं. )

## भर्ता व स्त्री

**यां नैव मनुते भर्ता न कोऽपि मनुतेऽपि ताम् २७** ( खं. २ अ. ३२ )
( अर्थ—जिचा भर्तांच मान ठेवीत नाहीं तिचा मान कोणीच ठेवीत नाहीं. )

## स्वभाव

**ऊष्ट्रस्तु कण्टकानत्ते हित्वा कोमलपल्लवान् ५ ॥** ( खं. २ अ. ५४. )
( अर्थ—कोमल पल्लव टाकून उंट म्हटला म्हणजे कांटेच खाणार. )

## पुरुषार्थ.

**मशके निहते कःस्यात् पुमर्थः पुरुषस्य च ॥ ३८ ॥** ( खं. २ अ. ५५ )

( अर्थः—माशीला मारल्यास पुरुषाचा पुरुषार्थ तो कसला ? )

## उड्डानशील कपि विरुद्ध सिंह.

**कपिरुड्डानशीलोऽपि न सिंहं बाधते क्वचित् ॥ २८ ॥**
**ग्रासशीलश्चाजगरो न महीं ग्रसते क्वचित् ।**

( खं. २ अ. ५६. )

( अर्थः—कपि उंच उडी मारण्यांत प्रवीण असला तर सिंहाला कशी बाधा करूं शकणार ? अजगर अगदीं गिळून टाकणारा प्रख्यात तरी धरिणीला गिळूं शकेल काय ? )

## खरा वीर.

**न वीराः परिशोचन्ति वीरे युद्धे मृते नृप ।**
**निघ्नंति तं बलात् गत्वा येनाऽसौ निहतो भवेत् ॥ ३१ ॥**

( खं. २ अ. ६२. )

( अर्थः—हे राजा ! रणांत वीर मारला गेला म्हणजे खरे वीर जे आहेत ते त्याविषयीं शोक करीत बसत नाहींत ! तर ज्यानें त्याला मारिलें असेल त्याला तेथें जाऊन आपल्या पराक्रमानें ठार मारून टाकतात. )

## वीरवल्गना.

देवान्तक दैत्य विनायक युद्धास उभा राहिला असें पाहून म्हणतो.

**कथं यातः शुष्कतालुर्नवनीतादनक्षमः ।**
**युद्धाय बाल न स्थेयं गच्छ मातुस्तनं पिब ॥ ३ ॥**

( खं. २ अ ६७ )

( अर्थः—याची तालु नुकतीच सुकली आहे, आतां कोठें हा लोणी खावयाला समर्थ झाला आहे. अरे बाळ ! तूं युद्धाला उभा राहूं नको. जा, जाऊन आईचें स्तन पिऊं लाग. )

## पितृवात्सल्य

**न पिता त्यजते बालान् सापराधानपि ध्रुवम् ॥ २८ ॥**

( खं. २ अ ७१ )

( अर्थः—मुलांचा अपराध असला तरी पिता त्यांचा त्याग करीत नाहीं. )

## अजा विरुद्ध कामधेनु

अजाप्रार्थनया किंतु कामधेनुफलं लभेत् ॥ २२ ॥
(खं. २ अ. १०७)

(अर्थः—शेळीची प्रार्थना करून कामधेनुफलांची प्राप्ति होत नसते.)

## प्रयोजन

विना प्रयोजनं पुत्र कोऽपि नायाति किंचन ॥ १२ ॥
(खं. २ अ. ९७)

(अर्थः—प्रयोजनावांचून बाबा ! कोणी कुठें येत नाहीं.)

## कोल्हा रुसला तर !

रुष्टः शृगालः किंकुर्यादप्रियं सिंहनागयोः ॥ २८ ॥
(खं. २ अ. १११)

(अर्थः—कोल्हा क्रुद्ध झाला तर सिंहाचें अथवा हत्तीचें काय वांकडें करणार ?)

## बीज तसा अंकुर.

अंकुरो जायते तादृक् यथा बीजं हि चोप्यते ॥१६॥ (खं. २ अ.११७)

(अर्थ–जसें बीजारोपण करावें तसा अंकुर होतो.)

## जपमाला व राजधर्म

कुशाक्षमालाधरणं राजधर्मे हि नेष्यते ॥ ५४ ॥ (खं.२अ.१२०)

(अर्थ–दर्भासनावर बसून अक्षमाला धारण करणें राजधर्मांत प्रशंसिलेलें नाहीं.)

## आत्महत्या.

प्राणत्यागे महद्दोषं वदन्ति शास्त्रचिंतकाः ॥१५॥(खं.२अ.१३४)

(अर्थ–मननपूर्वक शास्त्राभ्यास केलेले लोक सांगतात कीं आत्महत्या करणाऱ्यास मोठें पाप लागतें.)

## बालक आणि चंद्र

बालकः कौतुकाविष्टो याचते चंद्रमण्डलम् ॥६॥(खं.२अ.१३६)

(अर्थ–बालक कौतुकाविष्ट होऊन चांदोवा हातांत मागतो.)



## ( २ ) बुधाची गोष्ट.

गौड देशांत दुर्व नांवाचा धर्मशील ब्राह्मण रहात होता. त्याच्या पत्नीचें नांव शाकिनी असें होतें. त्यांना एक पुत्र झाला त्याचें नांव बुध ठेविलें होतें. सावित्री नांवाची याची स्त्री फार पतिव्रता होती. हा आपल्या पितरांचा एकुलता एकच पुत्र असल्यामुळें तीं त्यास सदैव अलंकृत ठेवीत. त्याचा क्षणभरही वियोग सोसण्यास तीं असमर्थ असत.

त्याला यौवन प्राप्त होतांच तो परनिंदा व परस्त्री यांत रत झाला. म्हणून त्यानें लवकरच स्वस्त्रीचा त्याग केला.

एकदां त्याच्या गावांत मन मोहित करणारी एक वेश्या आली. तिच्यावर त्याचें मन आसक्त झालें व त्यानें काय केलें पहा ! आपले दागिने सर्व वेश्येस दिले. स्वतांचें घर वर्जून तिच्या घरींच राहूं लागला. पुत्रदर्शना वांचून मी वांचणार नाहीं असें माता म्हणूं लागली. तिला रात्रौ पति म्हणाला " माझा पुत्र बुध कोठें गेला ? दीपाविणें जशी रात्रि, जलाविणें वापी, व अपत्याविणें स्त्री, तसें माझें गृह त्याच्या शिवाय मला शून्य भासूं लागलें आहे. "

पुत्राचा शोध करीत हिंडत असतांना त्याला एक वृद्ध अंत्यज भेटला व म्हणाला " तुझा पुत्र बुध कामासक्त होऊन वेश्येच्या येथें पडून आहे. हे धर्मशील ब्राह्मणा ! कोण कोणाचा पिता, माता, अथवा पुत्र आहे, तूं वृथा खेद करीत आहेस ! " पित्यानें जेव्हां पुत्रास वेश्येच्या घरीं जाऊन पाहिलें तेव्हां तो त्यास म्हणाला. " चंद्रामध्यें जसा कलंक तसा तूं माझ्या कुलांत अधम निर्माण झाला आहेस ! तुझ्याहून कांटेरी वृक्ष व शुष्क पाषाण चांगले. तूं प्राणत्याग कां करीत नाहींस ? तूं जगून काय उपयोग ? " पित्याचें वाक्य श्रवण करतांच रोषाविष्ट होऊन पित्याच्या तोंडांत मारून बुध उलट म्हणाला " कृमिकीटकां सारखें मुख असणाऱ्या नराधमा ! माझ्या क्रीडाकालीं तूं विघ्न आणलेंस ! एकाएकीं ही कावळ्याची विष्ठा माझ्यावर कशीरे पडली ! "

नंतर बुधानें लत्ताप्रहारानें पित्याचा प्राण घेतला व पायांस वांधून शव दूर ओढून टाकिलें. घरीं गेला तो तेथें माता भेटली. ती त्यास म्हणाली. " पुत्रा ! तुझ्या करतां अन्न वर्ज्य केलें आहे. तुझा पिताही तुझा शोध करीत भ्रमण करीत आहे. त्याला भेट. " असें ती वारंवार म्हणाली. तेव्हां कोपयुक्त होऊन तिला डोक्यावर शुष्क यष्टि घेऊन बुधानें मारिलें. तिचा प्राण गेला तेव्हां तिच्या पायास दोरी बांधून तिला बुधानें दूर ओढून फेंकून दिलें. पुन्हां बुध वेश्येकडे जाऊन राहिला.